# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक ११ जुलै, २०२४
## (सकाळी १०-०० ते १०-४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(बुधवार, दिनांक १० जुलै, २०२४ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ ते १६)**

**(१) सर्वश्री. महेश बालदी, प्रशांत ठाकूर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील मोरबे धरण प्रकल्पग्रस्तांच्या अनेक मागण्या अद्यापही पूर्ण करण्यात आल्या नसल्याचे माहे जून, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असणे, भूसंपादन व पुनर्वसन सन २०१३ चा कायदा मोरबे धरणास अद्यापही लागू केला गेला नसणे, भूसंपादनाच्या वेळी पंचनामे चुकीच्या पद्धतीने करण्यात आले असणे, वारंवार पकल्पग्रस्तांनी पंचनामे नव्याने करण्याची मागणी केली असणे, विस्तापित गावठाणातील घरांचे सर्वेक्षण करून वाढीव गावठाण मिळण्याची मागणी प्रकल्पग्रस्तांनी केली असणे, गावठाणातील नागरी सुविधा व घरांचे सर्वेक्षण करण्यासाठी प्रत्येक वसाहतीसाठी तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली समिती करण्याची मागणी करण्यात आली असणे, धरण प्रकल्पासाठी संपादित केलेली परंतु विनावापर शिल्लक असलेली जागा शेती प्रयोजनासाठी प्रकल्पग्रस्तांना देण्याबाबत विनंती केली असणे, प्रकल्पग्रस्तांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे तसेच पुनर्वसित गावांना महसूली दर्जा तसेच गावठाण दर्जा व पुनर्वसित गावांना स्वतंत्र ग्रामपंचायत देण्याबाबत मागणी केली असणे, पुनर्वसित गावठाणात देण्यात आलेल्या भूखंडांना भोगवटदार एक करून मिळावा तसेच आरकासवाडी, तिरकटवाडी, उंबरणेवाडी येथे रस्ता तयार करण्याची मागणी केली असणे, अशा अनेक मागण्यांवर अद्यापही कोणतीच कार्यवाही झाली नसल्यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झालेली असणे, प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण करणेबाबत शासनाने तातडीने करावयाची आवश्यक ती कार्यवाही व उपाययोजना."

**(२) सर्वश्री. सुनिल भुसारा, दिपक चव्हाण, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील ग्रामपंचायत कर्मचा-यांची वेतनश्रेणी, निवृत्ती वेतन व इतर मागण्या तसेच ग्रामपंचायत स्तरावरील प्रलंबित असलेल्या मागण्यांकरिता दिनांक १ जुलै, २०२४ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कामगार सेवा यांनी काढलेला मोर्चा, राज्यातील २७९२० ग्रामपंचायतींमधील सफाई, पाणीपुरवठा व विजपुरवठा कामगार, करवसुली कर्मचारी, लिपीक इत्यादी पदावर काम करत असलेले सुमारे ६० हजार कामगार अत्यल्प वेतनात नगरपंचायत, नगरपालिका कर्मचा-यांप्रमाणे ग्रामपंचायतीचे काम करत असणे, यासंदर्भात शासनाने आजपावेतो

४ समित्या गठीत करणे, एकाही समितीच्या अहवालास शासनाची मान्यता नसणे, परिणामी ग्रामपंचायत कर्मचा-यांवर होत असलेला अन्याय, ग्रामपंचायत कर्मचा-यांना नगरपालिका व जिल्हा परिषद कर्मचा-यांप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करणे, निवृत्ती वेतन लागू करणे, उपदान लागू करणे, भविष्यनिर्वाह निधीची रक्कम कामगार भविष्य निर्वाह निधी संघटना या कार्यालयात जमा करणे, वेतनासाठी लादलेली वसुलीची अट रद्द करणे, तसेच आकृतीबंधात सुधारणा करणे इत्यादी मागण्यांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी कर्मचा-यांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री. समाधान अवताडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"तापमानात झालेली वाढ, पडलेला दुष्काळ व निर्माण झालेली पाणीटंचाई यामुळे शेतकऱ्यांचे उभे पीक करपून जात असणे, यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडणे,या संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनातर्फे प्रधानमंत्री पिक विमा योजना राबविण्यात येणे, दरवर्षी खरीप हंगामात पिक विमा भरण्याचा कालावधी दिनांक १ ते ३१ जुलै असणे, दुर्दैवाने पीक कमी किंवा अधिक पावसामुळे खराब झाले तर कायद्यात शेतकऱ्यांनी विमा कंपनीला इंटिमेशन देण्याची तरतूद असणे, त्यानुसार सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मूग, उडीद, सोयाबीन, तूर, कांदा, मका, बाजरी आदी पिकांचे नुकसान झाल्याचे वेळेवर इंटिमेशन देऊन देखील विमा कंपनीकडून पंचनाम्यासाठी चाल ढकल करण्यात येणे व पंचनामे करून देखील ८ ते १० महिन्यांचा कालावधी उलटून देखील प्रत्यक्षात शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात येत नसल्याच्या तक्रारी प्राप्त होणे, शेतकरी हिस्सा, केंद्र व राज्य शासनाकडून विमा कंपनीला मागील वर्षात सोलापूर जिल्ह्यातून ३२१ कोटी ३० लाख रुपये मिळालेले असणे, परंतु प्रत्यक्षात मदत मात्र केवळ ११४ कोटी रुपये झालेली असणे, मागील वर्षीची रक्कम अद्याप खरीप हंगाम चालू होऊन शेतकऱ्यांना मदत न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पीक विमा कंपन्यांविरुद्ध असंतोष व नाराजीची भावना तयार होणे, यावर तात्काळ शासनाने विमा कंपन्यावर गुन्हे दाखल करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणे करता करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्री. संजय गायकवाड, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री संजयमामा शिंदे, बबनराव शिंदे, संतोष बांगर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील जनतेचे जीवनमान व वेतनस्तर उंचावल्यामुळे उत्पन्नाची मर्यादा रुपये ८ लाख असल्यामुळे विविध घटकातील उमेदवार व आई/वडिल यांचेसाठी सर्व प्रकारच्या शैक्षणिक कामांसाठी अडचणीचे ठरत असून विद्यार्थ्यांना शालेय प्रवेशापासून वंचित रहावे लागणे, महाराष्ट्र शासन निर्णय परिपत्रक क्र. सीबीसी-१०/ २००८/ प्र.क्र.६९७ / विजाभज-१ दिनांक १६ डिसेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार उत्पन्नाची मर्यादा रुपये ८ लाख असून, ही विविध प्रवर्गातील विद्यार्थी तसेच पालकांसाठी शैक्षणिक प्रवेशासाठी अडचणीची ठरत असल्याने सदर मर्यादा

१५ लाख रुपये करण्यात यावी अशी मागणी करण्यात येणे, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्रीमती गीता जैन, श्री. शिरीष चौधरी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मीरा-भाईंदर जिल्हा ठाणे येथील अनेक खाजगी रुग्णालये विनापरवानगी चालविण्यात येत असून अद्याप एकाही रुग्णालयाला परवानगी नसताना ते जनतेची लूट करीत असणे, त्यामुळे जनतेच्या व रुग्णांच्या जीवाला सातत्याने धोका होत असणे, रुग्णांकडून अवैधरित्या बिलांच्या नावाखाली पैसे उकळत असणे, मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील महानगरपालिकेच्या रुग्णालयातील कार्यरत असलेले भूलतज्ञ, वैद्यकीय अधिकारी बेकायदेशीरपणे ते खाजगी रुग्णालयात स्वतःची सेवा देत असणे, त्याबाबत अनेक तक्रारी महानगरपालिका आयुक्त व आरोग्य विभागास सातत्याने करूनही हा काळा धंदा बंद न करता ते तज्ञ बेकायदेशीरपणे सेवा देत असणे, मीरा-भाईंदर मीरा रोड येथील महानगरपालिका हद्दीतील अशोका हॉस्पिटल, रुग्णालयात एका मातेचा व अर्भकाचा भूलतज्ञ श्री. पाटील यांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झालेला असणे, त्यांच्यावरती अनेक आरोप असून अद्यापही त्यांची चौकशी वा त्यांचे निलंबन न होणे, त्यांच्याविरुद्ध व्यवसायरोध भत्ता मिळत असूनदेखील खाजगी व्यवसाय करीत असल्याबाबत संदर्भ रुग्ण कल्याण समिती अंतर्गत नियामक समितीची सभा दिनांक २१ जून, २०२४ नुसार कारणे दाखवा नोटीस काढण्यात आलेली असणे, तरीही अद्यापपर्यंत त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्रीमती विद्या ठाकूर, श्री.सुनिल राणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई शहर व उपनगरात प्रकल्प बाधितांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, प्रकल्प बाधितांना त्यांच्या मुळ घरापासून व परिसरापासून दूर अंतरावर विस्थापित होण्याची वेळ येणे, त्यामुळे त्यांच्या दैनंदिन जीवनावर प्रचंड मोठा ताण पडत असणे, त्यांच्या मुला-बाळांच्या शिक्षणाची गैरसोय निर्माण होणे, त्यांना मुळ ठिकाणी त्याच परिसरात पुनर्वसन करण्याची त्यांची मागणी जोर धरणे, मुंबई उच्च न्यायालयाने प्रकल्प बाधितांना माहूल येथे स्थलांतरीत करु नये असे स्पष्ट आदेश दिलेले असणे, अनिवासी प्रकल्प बाधितांना गाळयांची कमतरता असल्यामुळे प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत असणे, त्यामुळे प्रकल्प बाधितांचे त्यांच्या राहत्या मुळ घरापासून ५ किलोमीटरच्या परिसरात पुनर्वसन करण्याची मुख्य मागणी अनेक लोकप्रतिनिधींमार्फत केलेली असणे, प्रकल्प बाधितांसाठी तयार करण्यात आलेल्या सदनिकांचा काळा बाजार होत असणे, या सर्व घटनांमुळे नागरिकांच्या मनात शासनाविरुध्द निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**(७) सर्वश्री. सुनिल टिंगरे, रवींद्र धंगेकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे शहरात माहे जून, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात व त्या दरम्यान मुसळधार पाऊस होणे, सदर पावसामुळे लोहगाव, धानोरी, कलवड, येरवडा या भागांसह शहरातील विविध ठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होणे, सदर पावसाचे पाणी नागरिकांच्या घरांमध्ये, व्यावसायिकांच्या दुकानांमध्ये जाऊन नागरिकांच्या संसारउपयोगी वस्तूंसह घरांची पडझड होऊन प्रचंड आर्थिक नुकसान होणे, काही ठिकाणच्या भागातील विद्युतच्या डी.पी. पर्यंत पाणी जाऊन विद्युत प्रवाह पसरून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होणे, नागरिकांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत होणे, महानगरपालिकेने सदर भागांमध्ये पाण्याच्या विसर्गाबाबत उपाययोजना न केल्याने पावसाच्या पाण्यामुळे नागरिकांचे आतोनात नुकसान झाल्याचे निदर्शनास येणे, सदर उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे पुणे शहरातील नागरिकांमध्ये शासनाच्या विरोधात प्रचंड असंतोष निर्माण झालेला असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) सर्वश्री. अमित साटम, अबू आजमी, ॲड. पराग अळवणी, ॲड. आशिष शेलार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई उपनगरातील अंधेरी पश्चिम डी.एन नगर येथील भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या (भाविप्रा) हाय-फ्रिक्वेंसी ट्रान्समीटर परिघाच्या आतमध्ये येत असलेल्या रहिवाशी इमारतींच्या पुनर्विकास करण्याकरीता प्रतिबंध करण्यात आलेला असणे, सदर परिघामध्ये मध्यमवर्गीय करदाते मोठया प्रमाणात राहत असून त्यांनी मोठया कष्टाने कमावलेल्या पैशातून घर विकत घेतलेली असणे, सद्यस्थितीमध्ये सदर ठिकाणच्या इमारतींची अवस्था अत्यंत खराब झालेली असून काही इमारती तर मोडकळीस आलेल्या असणे, हाय-फ्रिक्वेंसी ट्रान्समीटरमुळे सदर इमारतींच्या उंचीच्या निर्बधांमुळे पुनर्विकास करता येत नसल्यामुळे प्रामाणिकपणे कर भरणाऱ्या सर्व सामान्य रहिवाशांना प्रचंड अडचणी येणे, भारतीय विमानतळ प्राधिकरण व महानगरपालिका यांच्या संयुक्त सभेमध्ये असे सूचविण्यात आले असून मुंबई येथील एचएफ टीएक्स आणि आरएक्स सिस्टीम्स या मुख्य शहराच्या बाहेर गोराई येथील महानगरपालिकेच्या जमिनीवर स्थलांतरीत करुन सदर डीएन नगर येथील भारतीय विमानतळ प्राधिकरणाची जमीन महानगरपालिकेला उद्यान विकसित करण्याकरीता हस्तांतरीत करणे, परंतु भाविप्रा व महानगरपालिका यामध्ये यापुढे यांच्यावर कार्यवाही न होऊन सदर विषय हा प्रलंबित असणे, त्यामुळे सदर एचएफ आणि आरएक्स सिस्टीम्स गोराई येथील महानगरपालिकेच्या जमिनीवर हस्तांतरीत करण्याकरीता महानगरपालिकेची जमीन ही भाविप्राला हस्तांतरीत करण्यासंदर्भात कार्यवाही करण्याची आवश्यकता व भाविप्राची जमीन महानगरपालिकेला हस्तांतरीत करुन त्या ठिकाणी उद्यान विकसित करण्याकरीता कार्यवाही करण्याची आवश्यकता, जेणेकरुन सर्वसामान्य रहिवाशांना दिलासा देण्याबाबत राज्य शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) श्री. भिमराव तापकीर, ॲड. राहूल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये सन १९९७ मध्ये समाविष्ट धनकवडी, कोथरूड, वारजे, वडगाव खुर्द, वडगाव बुद्रुक, धायरी, कात्रज व इतर मिळून २३ गावांचा सिटी सर्व्हे रखडणे, परिणामी शासकीय योजनेच्या लाभांपासून वंचित रहावे लागणे, सन २०१७ मध्ये शिवणे, उत्तमनगर, धायरी मिळून ११ आणि सन २०२१ मध्ये खडकवासला, कोंढवे धावडे, कोपरे, नांदेड, नांदोशी, नऱ्हे व इतर अशा २३ गावांचा समावेश होणे, या पैकी ११ गावांचा विकास आराखडा प्रलंबित असणे, २३ गावांची विकास योजना कलम ३१ अन्वये प्रलंबित असणे, समाविष्ट गावांना महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे पहिले २ वर्ष ग्रामपंचायतनुसार मिळकत कर आकारून सर्व मिळकतींना सन २०१९ हे वर्ष सुरुवातीचे वर्ष धरून सदर वर्षापासून कमीत कमी वाजवी भाड्याचा दर निश्चित करून सदर दर कर मूल्यांकनाकरिता घेणे, लगतच्या भागानुसार कर आकारणी 'न' करता त्या भागानुसार कर आकारणी करणे, समाविष्ट गावात कर आकारणी मध्ये स्पष्टता नसल्याने मिळकत कर 'न' भरलेल्यांना वार्षिक करासह प्रतिमहा २% व्याजदर सह जाचक मिळकत कर न आकारणे, वडगाव बुद्रुक-स.नं. ४३ ते ४९ मध्ये घरांवर बीडीपी आरक्षण फेर बदल प्रस्ताव जा.क्र.मआ/शअजा/१८७९३, दिनांक ६ मार्च, २०१९ अन्वये प्रधान सचिव, नगरविकास स्तरावर प्रलंबित असणे, नांदेड सिटी रहिवाश्यांना जुन्या नावाने मिळकत कर बिले दिल्याने रिसेल फ्लॅट धारकांना PT3/40% सवलत नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१०) सर्वश्री. नानाभाऊ पटोले, विनोद निकोले, मिहीर कोटेचा, सुनिल प्रभू, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात अंदाजे ३० लाखाच्या आसपास फेरीवाले असून फेरीवाल्यांना कायदेशीर अधिकार देवून त्यांना सन्मानाने जगता यावे यासाठी भारताच्या संसदेत सन २०१४ मध्ये कायदा बनविण्यात आला असणे, त्यानुसार प्रत्येक राज्याने कायदा अंमलबजावणी करण्यासाठी नियमावली व योजना बनविणे आवश्यक असणे, त्यानुसार महाराष्ट्र राज्याने सन २०१६ मध्ये नियमावली जाहीर केली असणे, परंतु योजना आजपर्यंत बनविलेली नसणे, अनेक हॉकर संघटनांद्वारे अनेकदा पाठपुरावा करुन देशातील इतर राज्यातील योजनांचा अभ्यास करुन त्यांचा अहवाल राज्य शासन व राज्य नगर परिषद प्रशासन यांना सादर केले असूनही आजही सदर योजना राज्यात लागू करण्यात आली नसणे, फेरीवाल्यांसाठी कायदा असूनही राज्यात केवळ योजना नसल्याने फेरीवाल्यांवर अमानुष कारवाई करण्यात येत असणे, फेरीवाल्यांना संविधानाने दिलेले त्यांचे हक्क व अधिकार यापासून वंचित राहावे लागत असणे, राज्यातील ३० लाख फेरीवाले व त्यांच्या कुटुंबियांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावायाची कार्यवाही व उपाययोजना."

**(११) श्री. तान्हाजी मुटकुळे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मौ. नर्सी नामदेव (ता.जि.हिंगोली) येथील सरकारी मालकीची जमीन ७५०,७५१,७५२, ७३४ व ६५४ ही फेरफार क्र. १२१७ दिनांक १४ ऑगस्ट, १९८२ नुसार शासनास कायमची वर्ग केल्या जाणे, शासनाच्या मालकीची जमीन असतांना सुध्दा उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांनी महसूली अभीलेख्याची तपासणी न करता विरासत मंजूर करून दिनांक ६ डिसेंबर, २०१३ चे आदेशानुसार तहसीलदार हिंगोली यांना विरासतदारांची नावे ७/१२ उताऱ्यामध्ये इतर हक्कात नोंद घेण्याबाबत निर्देश देणे, सन २०१८ मध्ये तहसीलदारांनी बेकायदेशीररित्या फेरफार क्र. २०४४/२०१८ मंजूर करून इतर हक्कात नोंद व मालकी हक्कात नोंद घेणे, लोकप्रतीनिधीनी केलेल्या तक्रारीनुसार नेमलेल्या चौकशी समितीने अहवालात आढळून आलेल्या दोषींवर कोणतीही कारवाई करण्यात न येणे व हेतुपुरस्सर फेरफार दुरूस्ती करण्याचे टाळले जाणे, परिणामी शासनाची मालमत्ता बेकायदेशीररित्या खाजगी व्यक्तीच्या मालकीची होणे, यामुळे शासनाचे होणारे नुकसान, झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची व सदर प्रकरणी बेकायदेशीररित्या मंजूर केलेली विरासत व फेरफार क्र. २०४४ रद्द करून शासनाची कमी झालेली जमीन शासन जमा करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१२) श्री. जितेश अंतापूरकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नांदेड जिल्हयातील सरगोळी (ता.बिलोली) येथे डेपो क्रमांक दोन वरुन वाळू भरून निघालेल्या हायवाने देगलूर मार्गावर दोन दुचाकीस्वार तरुणांना चिरडले असणे, यामध्ये दोन युवकांचा जागीच मृत्यू झाला असणे, अपघातग्रस्त हायवाची क्षमता ही ३.५ ब्रास असतांना ६ ब्रास वाळूची अवैध्यरित्या वाहतूक करणे, सुट्टीच्या दिवशी वाळू डेपो बंद असतांना वाळूची अवैध्यरित्या वाहतूक करणे, याबाबत तहसिलदार, पोलीस प्रशासनाचे सातत्याने होत असलेल्या दुर्लक्षामुळे दोन युवकांचा मृत्यू होणे, तहसिलदार, संबंधित अधिकारी व वाळू माफीया यांच्यामध्ये संगनमत असल्याचे निदर्शनास येणे, मृत युवक यांच्यावर कुटूंबाची जबाबदारी असल्यामुळे मृत युवकांच्या कुटूंबावर उपासमारीची वेळ आलेली असणे, कुटूंबात आक्रोश नाराजीचे वातावरण निर्माण होऊन जनतेमध्ये असंतोषाचे भावना निर्माण होणे, मृत व्यक्तींच्या कुटूंबाला शासनाकडून आर्थिक मदत मिळण्याकरीता व अवैध्यरित्या वाळू वाहतुकीस आळा घालण्याकरीता शासनाकडून तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१३) श्री. जयकुमार गोरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात गौण खनिजांच्या वाहतुकीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून गौण खनिज वाहतूक पास देण्यात येणे, विशेषत: रायगड जिल्ह्यातील इम्युनिटी वेलकॉन व मे इम्युनिटी गौरव बी के आणि भारतीय इन्फ्रा प्रोजेक्ट्स लि जे व्ही या दोन कंपन्यांना

अप्रकाशित प्रत

देखील गौण खनिज वाहतूक पास दिलेले असणे, या कंपन्यांनी गौण खनिज वाहतुकीसाठी बनावट वाहतूक पास पुस्तिका छापून त्या खऱ्या भासवून त्यांचा गौण खनिज वाहतुकीसाठी वापर केल्याची बाब निदर्शनास येणे, तसेच त्याबाबतीत या कंपन्याविरुद्ध पनवेल शहर पोलीस स्टेशन येथे सन २०२३ मध्ये अज्ञात व्यक्तीवर फिर्याद दाखल होणे, तरीदेखील या कंपन्यांकडून गौण खनिजांची वाहतूक चालू असणे, आणि आरोपींना शासनाने अभय देणे, अशा प्रकारच्या पावत्या छापून शासनाशी करार असलेली सुर्या इन्फोटेक कंपनी राज्यभर खनिज माफीयांशी संगनमत करून बेकायदेशीर पावती पुस्तके पुरवित असणे, या अनुषंगाने शासनाचा महसूल चुकविणाऱ्या विरुद्ध कारवाई करून महसूलाची चोरी रोखण्याकरिता संबंधित कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची मागणी करण्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१४) श्री. राजकुमार पटेल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे रोजगार हमी योजना मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"देशात आतापर्यंत ३ लाखांच्यावर शेतक-यांच्या आत्महत्या होणे, त्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील आत्महत्यांची संख्या सर्वाधिक असणे, शासनाने कर्जमाफी करुनसुध्दा शेतकरी आत्महत्या कमी न होता अधिक प्रमाणात वाढणे, शेतीमालाच्या भावाची घसरण होणे, त्यासाठी उपाययोजना म्हणून पेरणी ते कापणी पर्यंतची कामे MREGS किंवा रोहयो मधुन करण्याची गरज असणे, फळबाग लागवडीसाठी MREGS मधून ३ वर्षाच्या योजनेमध्ये वाढ संगोपनासाठी अधिक ५ वर्षे MREGS मधून योजना राबविण्याची गरज असणे, तसेच मेळघाट, धारणी, चिखलदरा सर्वाधिक कुपोषण सारख्या आदिवासी बहुल क्षेत्रात मजूरांचे होणारे स्थलांतर रोखण्यासाठी MREGS मधून किमान ८ महिने सर्व मजुरांना शासनाच्या उपायोजना कमी पडणे, MREGS योजनेचा अधिक वापर होण्यासाठी काही अटी व शर्ती कमी करण्याची गरज असणे, तसेच MREGS मधील किंवा शेतमजुराचा अपघात झाल्यास स्व. गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेच्या धर्तीवर मदतीची गरज असणे, MREGS मजुरांना बांधकाम मंडळात समाविष्ट केल्याप्रमाणे शेतमजुरांनासुध्दा बांधकाम मंडळात समाविष्ट करण्याची सातत्याने होत असलेली मागणी व MREGS मजुरांना वेळेवर मजुरी मिळणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१५) श्रीमती श्वेता महाले, डॉ. राजेंद्र शिंगणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव ते सिंदखेडराजा या भक्ती महामार्गासाठी मागील वर्षीच्या अर्थसंकल्पात घोषणा झालेली असणे, सदर भक्ती मार्ग सिंदखेडराजा, देऊळगावराजा, चिखली, खामगाव, शेगाव या तालुक्यातील ४३ गावांतून जात असणे, त्यामुळे या सर्व गावात शेतकऱ्यांची सुपीक व कसदार जमीन अधिग्रहीत करण्यात येत असणे, याबाबतची अधिसूचना देखील प्रसिध्द झालेली असणे, सदर अधिग्रहण सुचनेमुळे शेतकरी वर्गात प्रचंड असंतोष निर्माण होणे, प्रस्तावित भक्ती

महामार्गामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात भूमिहीन होणार असणे, सदर ४३ गावांतील शेतकऱ्यांचा या भक्ती मार्गाला विरोध असणे, तसेच ग्रामपंचायतींनी ठराव तयार करून जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचेमार्फत मुख्यमंत्री यांचेकडे सादर केलेला असणे, शेतकऱ्यांचा असंतोष पहाता सदर भक्ती महामार्गासाठी ४३ गावातील शेतकऱ्यांच्या शेत जमिनी संपादित करण्यात येऊ नये व प्रस्तावित शेगाव ते सिंदखेड राजा हा भक्ती महामार्ग रद्द करण्यात यावा अशी होणारी मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१६) श्री. मंगेश कुडाळकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नेहरूनगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींचा पुनर्विकास १० ते १५ वर्ष होऊनही अद्याप त्यांना भोगवटा प्रमाणपत्र (OC) मिळालेले नसणे, विकासक यांच्याकडे लक्ष देत नसणे, संपूर्ण जबाबदारी ही रहिवाश्यांवर येणे, सदरहू विकासक आणि वास्तुविशारद यांच्यावर कारवाई होणे गरजेचे असणे, तसेच अशा इमारतींसाठी भोगवटा प्रमाणपत्र करिता आकारण्यात येणारा दंड आणि शुल्क भरणे सामान्य नागरिकांना परवडणारे नसणे, या करिता अभय योजना आणण्याची मागणी सन्मा. सदस्यांमार्फत सातत्याने होत असणे, मा. मुख्यमंत्री यांचे निर्देश असूनही अद्याप अभय योजनेबाबत गृहनिर्माण विभाग व नगरविकास विभागाकडून कोणताही प्रस्ताव सादर न होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(सकाळी ११-०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री : (क)** लोकआयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २९ मे, २०१४, दिनांक १८ जून, २०१४, दिनांक १३ जून, २०१४, दिनांक ०१ जुलै, २०१४, दिनांक २१ डिसेंबर, २०१५, दिनांक ३१ मे, २०१६, दिनांक १० एप्रिल, २०१३, दिनांक १६ सप्टेंबर, २०१३, दिनांक ०८ डिसेंबर, २०१५, दिनांक १७ डिसेंबर, २०१५, दिनांक ०१ जानेवारी, २०१८, दिनांक ०१ जानेवारी, २०१८, दिनांक ०५ जानेवारी, २०१८, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ चे मा.राज्यपाल महोदयांना सादर केलेले असे एकूण १६ विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवतील.

अग्रिम प्रत

**(ख)** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिडकोच्या वाळुज प्रकल्पाबाबत या विषयावरील श्री.प्रकाश सोळंके, वि.स.स. यांच्या दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी झालेल्या म.वि.स. नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री :** लिंगभाव अर्थसंकल्प विवरणपत्र (Gender Budget Statement) व बाल अर्थसंकल्प विवरणपत्र (Child Budget Statement) २०२४-२०२५ हे प्रकाशन सभागृहासमोर ठेवतील.

**(३) सांस्कृतिक कार्य मंत्री :** "हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांचे जन्मस्थळ असलेल्या खेड येथील वाडयाचे राष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे." या विषयावरील श्री.दिलीप मोहिते-पाटील व इतर वि.स.स. यांच्या दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी झालेल्या म.वि.स. नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचनेच्या चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार हुतात्मा शिवराम हरी राजगुरु जन्मस्थळ परिसर विकास आराखड्यासंदर्भातील प्रगती अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(४) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा साठावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(५) मृद व जलसंधारण मंत्री :** महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचे सन २०१५-२०१६, सन २०१६-२०१७, सन २०१७ २०१८ व सन २०१८-२०१९ या कालावधीच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षण यांचा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(६) कामगार मंत्री : (क)** परभणी-हिंगोली जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, परभणी यांचे सन २०१९-२०२० ते २०२०-२०२१ या वर्षांचा सोळावा, सतरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** सांगली जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा छत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ग) जालना जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जालना यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा तेहतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(घ) दि रेल्वे गुडस् क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डीग एस्टॅब्लिशमेंटस् लेबर बोर्ड, मुंबई यांचा सन २०२१ २०२२ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ङ) पुणे माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा बेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(च) भंडारा व गोंदीया जिल्हा माथाडी, हमाल व असंरक्षित कामगार मंडळ, भंडारा यांचे सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या वर्षांचा लेखा परिक्षण व वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(छ) कापूस बाजार कामगार मंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ज) मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(झ) जळगाव माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जळगाव यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षण व कामकाज अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ट) किराणा बाजार आणि दुकाने माथाडी मंडळ यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ठ) लातूर आणि उस्मानाबाद जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, लातूर यांचा सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या वर्षांचा एकतीसावा व बत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

**(ड)** धुळे-नंदुरबार जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, धुळे यांचा सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचा बत्तीसावा व तेहतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ढ)** अमरावती जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अमरावती यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ण)** नाशिक जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा सदतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(त)** महाराष्ट्र मच्छीमारी उद्योगातील मच्छीमार आणि इतर श्रमजीवी कामगार मंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा आठवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(थ)** बीड जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, बीड यांचा सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या वर्षांचा पंचवीसावा व सव्वीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(द)** धातू (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार व दुकाने माथाडी कामगार मंडळ मुंबई यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ध)** कोल्हापूर जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, कोल्हापूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(न)** मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई यांचे सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या वर्षांचा सदतीसावा व अडतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(प)** नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नागपूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

अमुद्रित प्रत

**(फ)** रत्नागिरी जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, रत्नागिरी यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, सांगली यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(भ)** औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, औरंगाबाद यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(म)** अहमदनगर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, अहमदनगर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(य)** अमरावती जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, अमरावती यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा नववा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(र)** पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकोणीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ल)** नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा अठरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना – (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : शुक्रवार, दिनांक १२ जुलै, २०२४ रोजीच्या अशासकीय कामकाजाबाबत घोषणा**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(मंगळवार, दिनांक ९ जुलै, २०२४ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ ते ४)**

(१) **श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"देवळाली विधानसभा क्षेत्रातील मौजे वासाळी, मोहगांव-बाभळेश्वर, जाखोरी, दुगांव, वाडगांव व नाणेगांव (जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यांवर जलसंपदा विभागाकडून “पाटचारी” नोंदी टाकण्यात आलेल्या असणे, सदर शेतक-यांच्या सातबारा उता-यांवर “पाटचारी” नोंदी टाकताना जलसंपदा

विभाग आणि महसूल विभागाने संबंधित शेतकऱ्यांना विश्वासात न घेता कोणतीही पुर्वसूचना किंवा नोटीस देण्यात आलेली नसणे, तसेच त्याठिकाणी प्रकल्पही उभारण्यात आलेला नसणे, त्यामुळे सदरच्या नोंदी रद्द करण्याबाबत शेतकऱ्यांची आग्रही मागणी असणे, त्यासंदर्भात सन्मा. स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ जानेवारी, २०२४ रोजी जिल्हाधिकारी, नाशिक यांचेसमवेत बैठक घेऊन तशी मागणी करण्यात येणे, परंतु सदरचा निर्णय हा शासनाचा धोरणात्मक निर्णय असल्याने त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी निर्णय घेण्यास असमर्थता दर्शविणे, त्यानंतर दिनांक २४ जानेवारी, २०२४ रोजी मा.उपमुख्यमंत्री, (वित्त) यांना पत्र/निवेदन देण्यांत येणे, परंतु अद्याप शासनाकडून त्याबाबत कार्यवाही न होणे, परिणामी, शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले संभ्रमाचे वातावरण व चिंतेची भावना, त्यामुळे शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावरील "पाटचारी" म्हणून केलेल्या नोंदी रद्द करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री. योगेश कदम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील कोकण पाटबंधारे विकास महामंडळाअंतर्गत न्यु-मांडवे प्रकल्प सन १९९४ पासून सुरु होणे, या लघु पाटबंधारे प्रकल्पांची सुमारे २०.४३३ दशलक्ष पाणी साठा साठवून ठेवण्याची क्षमता असून, यामुळे ९९६ हेक्टर क्षेत्र कायमस्वरुपी सिंचनाखाली येणार असल्याने १५ ते २० टंचाईग्रस्त गावांना लाभ मिळणार असणे, सदर प्रकल्पासाठी १ ते ११ कि.मी. कालवा नियोजित करुन १० कि.मी. मधील मुख्य कालव्याचे काम ९० टक्के पूर्ण केले असून, मोठी बांधकामे-४, गाव रस्ता पूल-६ व जलक्षेत्र-३ इ. कामे निधी अभावी प्रलंबित असणे, माहे जानेवारी २०२२ अखेरपर्यंत ४९ कोटी ९६ लाख खर्च आवश्यक असलेल्या १८ नागरी सुविधांपैकी तळे येथील १६ व मांडवे येथील १५ नागरी सुविधांची निविदा निश्चित करुन करण्यात येणे, तर प्रकल्पाच्या उर्वरित नागरी सुविधांसाठी १५५ कोटी ९० लाख इतका खर्च अपेक्षित असल्याबाबतचे मान्यतेचे पत्र राज्य तांत्रिक सल्लागार समितीने दिनांक ६ ऑक्टोबर, २०२३ रोजी शासन स्तरावर सादर केले असून, शासन पत्र क्र. लपायो २०२३/प्र.क्र.१७४/ खारभूमी/२०२४ चे पत्र दिनांक १४ फेब्रुवारी, २०२४ रोजी शासनास सादर केले असणे, मात्र याबाबत अद्याप निधी मंजूर न झाल्याने ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेली संतापाची भावना, त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) सर्वश्री. प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, महेश बालदी, श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरिकांची पाण्याची गरज भागविताना महानगरपालिकेला अनेक अडचणी निर्माण होत असणे,पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील पाण्याची सध्याची मागणी प्रतिदिन २५९ दललि प्रतिदिन असून प्रतिदिन २२४ दललि पुरवठा होत असणे, सध्याची लोकसंख्या पहाता पनवेल महानगरपालिकेला ३५ दशलक्ष पाणी अपुरे पडत असणे, पनवेल

अप्रकाशित प्रत

महानगरपालिकेचा झपाट्याने होणारा विकास पहाता व मोठया प्रमाणात वाढणारे नागरीकीकरण लक्षात घेता भविष्यात जवळपास ८५० दक्षलक्ष प्रतिदिन पाण्याची आवश्यकता लागणार असणे, भविष्यातील पाण्याची गरज भागविण्याकरीता सिडकोच्या प्रस्तावित कोणत्याही धरणामध्ये पनवेल महानगरपालिकेस आरक्षण नसणे, पाण्याची गरज भागविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने कुंडलिका नदीवरील डोलवहाल बंधा-यातून ५०० दक्षलक्ष प्रतिदिन पाणी आरक्षित करण्याचा प्रस्ताव मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग यांच्या कार्यालयामार्फत कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांच्या कार्यालयास दिनांक २१ जानेवारी, २०२४ रोजी सादर केला असणे, परंतु पनवेल महानगरपालिकेच्या पाणी आरक्षणाच्या मागणीपूर्वी कोणताही महानगरपालिकेचा प्रस्ताव पाटबंधारे विभागास सादर केला नसणे, पनवेल महानगरपालिकेच्या आवश्यक पाण्याची मागणी शिफारसीसह जलसंपदा विभागाने वरिष्ठ कार्यालयास सादर केली असणे, पनवेल महानगरपालिकेला पाणीपुरवठा करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावावर अद्यापही कोणतीच कार्यवाही झाली नसल्यामुळे पनवेल महानगरपालिकेला भविष्यात भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागण्याची शक्यता असणे, त्यासाठी शासनाने पनवेल महानगरपालिकेला कुंडलिका नदीवरील डोलवहाल बंधा-यातून ५०० दक्षलक्ष प्रतिदिन पाणी आरक्षित करण्याच्या प्रस्तावाला तातडीने मंजुरी देण्यासाठी शासनाने करावयाची आवश्यक ती कार्यवाही व उपाययोजना."

**(४) ॲड. राहूल कुल, श्री. दत्तात्रय भरणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे जिल्ह्यातील खडकवासला प्रकल्प ते लोणी काळभोरपर्यंत बंदनळी कालव्याचा प्रस्ताव मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने सुमारे ३४ कि.मी. अंतरात कालव्याच्या पाण्याची मोठ्या प्रमाणात नासाडी होत असणे, यामुळे दौंड, हवेली व इंदापूर तालुक्यातील नागरिक व शेतकऱ्यांना पाण्यापासून वंचित राहावे लागत असणे, कालवा उघडा असल्याने नागरिक त्यामध्ये मोठ्या प्रमाणात राडारोडा टाकत असणे, बंदनळी कालवा झाल्यास उपलब्ध होणारी जागा रस्ते व इतर सार्वजनिक कामासाठी उपयोगी येणे, यासाठी २००० कोटीचा खर्च अपेक्षित असणे, याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी प्रलंबित असणे, जनाई शिरसाई व पुरंदर उपसा सिंचन योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित नसल्याने परिसरातील ४० हून अधिक गावांना दुष्काळाचा सामना करावा लागणे, वॉल्व, विमोचक, जोडणीच्या ठिकाणी गंज लागण्याचे प्रमाण मोठे असल्यामुळे पाण्याची गळती होणे त्यामुळे सदर प्रकल्प बंदनळीतून करण्याचे प्रस्तावित असणे, बंदनळी प्रकल्प झाल्यास पाणी बचत होऊन लाभक्षेत्रातील इतर अनेक तलाव त्याला जोडणे शक्य असणे, कोयना जलविद्युत प्रकल्प व टाटा जलविद्युत प्रकल्प समूहास वीज निर्मितीसाठी कृष्णा खो-यातून विपुलतेच्या खोऱ्यात वळविण्यात येणारे पाणी टप्प्या टप्प्याने कमी करण्याकरिता अभ्यास गट गठीत करण्यात आलेला असणे, सुर्वे समितीचा अहवाल शासनाकडे मान्यतेसाठी प्रलंबित असणे, याबाबत शासनाने करायची कार्यवाही व उपयोजना."

**(५) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील विलेपार्ले (पूर्व) रेल्वे स्थानकासमोर मुंबई महानगरपालिका व एमएमआरडीए प्राधिकरणातर्फे कॅप्टन तेजपाल मार्गावर बांधण्यात आलेल्या कॅप्टन विनायक गोरे या पुर्व-पश्चिम उड्डाण पुल व मिलन सबवेचा सुभाष रोड या हायवेला जोडणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होऊन वाहतुक ठप्प होऊन वाहन चालक व जनतेची प्रचंड गैरसोय होत असल्याचा प्रकार दिनांक १२ जून, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, सदरहू ठिकाणी मुंबई महानगरपालिकेतर्फे रुंदीकरणाची संथगतीने सुरु असलेली कामे आणि विशेष करुन सायंकाळी पिक हावर्सच्या वेळी वाहतुक ठप्प होऊन वाहन चालक व प्रवासी जनतेस तासन तास ट्रॅफीकमध्ये अडकून रहावे लागल्याने वेळेचा व इंधनाचे मोठ्या प्रमाणात झालेले व अद्यापही होत असलेले आर्थिक नुकसान व प्रचंड गैरसोय होत असणे, मुंबई महानगरपालिका प्रशासनाचे अयोग्य नियोजन व रस्ता रुंदीकरणाची अपुर्ण कामे पुर्ण न करता अर्धवट अवस्थेत प्रलंबित ठेवण्यात येणे, तसेच शासनाच्या नगरविकास व परिवहन विभागाचे अधिकारी यांचे अयोग्य नियोजन व समन्वयाअभावी या परिसरातील लाखो जनतेची गैरसोय होऊन मनःस्ताप सहन करावा लागणे, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री. दिलीप लांडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सन २००५ मध्ये मुंबई शहरामध्ये झालेल्या महाप्रलयकारी अतिवृष्टीमुळे मिठीनदी शेजारील क्रांतीनगर, संदेशनगर, जरीमरी येथील झोपडीधारकांच्या घरांवरून ७ ते ८ फूट उंचीवरून पाणी वाहून मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तीय हानी झालेली असणे, तत्कालीन पंतप्रधान व मुख्यमंत्री यांनी तात्काळ निर्णय घेऊन मिठी नदीपात्रातील व विमानतळ प्राधिकरणाच्या जागेवरील झोपडीधारकांसाठी स्थलांतरणाचा प्रस्ताव मंजूर करून सुमारे ३० ते ३२ इमारती खाजगी विकासकाकडून एच.डी.आय्.एल.संकुल, प्रिमिअर वसाहत, कुर्ला (प) येथे बांधण्यात येणे, सदर झोपडपट्टीचे शासकीय नियमाप्रमाणे स्थलांतरण सर्वेक्षण करून झोपडीधारकांचे पात्रता निश्चित करण्यात येणे, प्रत्यक्षात ज्या झोपडपट्टीधारकांसाठी इमारती बांधल्या, सदनिकांच्या चाव्या दिल्या, आश्वासने दिली, त्यांचे जीवनमान प्रत्येक पावसाळ्यात धोक्यात आल्याने त्यांना प्राधान्याने सदनिका मिळण्याची निर्माण झालेली आवश्यकता, मात्र त्यांना घरे न देता विशेषतः माहिम खाडी, रेल्वे प्रकल्प, मेट्रो प्रकल्प इत्यादी इतर प्रकल्पबाधीत झोपडीधारकांचे स्थलांतरण करण्यात येणे, सदर पात्र झोपडीधारकांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जाहीर तीव्र निषेध व्यक्त करून विमानतळ प्राधिकरणाच्या जागेवरील व मिठी नदीपात्रातील पात्र प्रकल्पबाधितांच्या ४०९२ झोपडीधारकांना प्रथम प्राधान्य देऊन त्यांना त्यांच्या हक्काची सदनिका देऊन पुनर्वसन करण्याची शासनाकडे केलेली

अप्रकाशित प्रत

मागणी, उक्त प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसून त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्रीमती लताबाई सोनवणे, श्रीमती मंजुळा गावीत, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सणसवाडी पालिका मालमता सी.एस.नं ७६१, माझगाव डिव्हिजनच्या भुखंडावर डीसी ३३ (७) अंतर्गत विकासक मे.ओम शांती प्रॉपर्टीजने मुख्य प्रर्वतक पारीजात को-आ.है.सो.(नि.) नावाने एलओआय घेणे, घेतल्यानंतर विकासकाने आयओडी न घेणे,सन २०१७ पर्यंत वारंवार एलओआय पुर्नप्रमाणीत करून घेणे, सन २०१६ मध्ये पुनर्विकसित करावयाच्या इमारतींसाठी आयओडी प्राप्त झाल्यावर विकासकाने पुनर्विकासाचे काम सुरू न केल्याने, महानगरपालिकेने दिनांक १३ एप्रिल, २०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस विकासकाला बजावत, दिनांक १० एप्रिल, २००८ रोजी एलओआय दिनांक १६ जुलै, २०१८ रोजी निरस्त करून विकासकाला मिळकत विकसित करण्यास प्रतिबंध करणे, विकासकाने कारस्थान रचून सचिवाच्या संगनमताने सदस्यांना विश्वासात न घेता दिनांक ३१ जुलै, २०१८ रोजी एलओआय नुतनीकरण करण्यासाठी विकासकाला पत्र देणे, दोन लोकप्रतिनिधींच्या शिफारस पत्राद्वारे पालिका अधिकाऱ्यांवर दबाव आणून भ्रष्ट मार्गाने एलओआय परत नुतनीकरण करून घेणे, सन २०२८ पासून इमारतींच्या पुनर्विकासाबाबत काणतीही कार्यवाही न करणे, नादुरूस्त इमारतीची दुरूस्ती विकासकाने न करणे, त्यामुळे इमारत धोकादायक होऊन रहीवाश्यांचे जीवन धोक्यात येणे, भागीदारी फर्म मध्ये बदल करून विकासक गोल्ड प्लाझा यांना भागीदार करणे, पावर ऑफ ॲटर्नी धारक सातत्याने गुंडांद्वारे धमकावित असल्याने रहिवाश्यांत तीव्र स्वरूपाचा असंतोष पसरून घबराटीचे वातावरण निर्माण होणे, यावर शासनाने विकासकाचे एलओआय व आयओडी रद्द करण्याची कार्यवाही करण्याची आवश्यकता, यासह नवीन विकासक नेमण्याची संधी देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपयोजना."

**(८) श्री. सुनिल राऊत,श्री. मिहीर कोटेचा, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"कांजुरमार्ग (मुंबई) येथील डंम्पिगवर दररोज सुमारे पाच हजार मेट्रिक टन कच-याची बायोरिॲक्टर पध्दतीने विल्हेवाट लावली जाणे, या पध्दतीने विल्हेवाट लावल्यामुळे दुर्गंधीची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असल्याने गेल्या काही महिन्यांपासून कच-याच्या असहय दुर्गंधीमुळे मुलुंड, भांडूप, कांजुरमार्ग, विक्रोळी, घाटकोपर, चेंबुर, कुर्ला या भागातील नागरिक हैराण होणे, दुर्गंधीमुळे चक्कर येणे, श्वास घेण्यास अडथळे, डोकेदुखी, डोळे चुरचुरणे, सुका खोकला, घशाला संसर्ग याबाबत नागरिकांच्या तक्रारी, यापूर्वी हा त्रास मुलुंड, भांडूप,कांजुर,विक्रोळीपर्यंत होता आता तो घाटकोपर, चेंबुर, कुर्ला, शीव येथील नागरिकांना जाणवणे, डंम्पिग

ग्राऊंडबाबत स्थानिकांनी सातत्याने तक्रारी करणे, आंदोलने करुनही प्रशासनाकडून होत असलेले दुर्लक्ष, कांजूरमार्ग क्षेपणभूमी ही पाणथळ जागा असल्याने प्रक्रिया जागेचा क्षेपण भूमीकरिता कायदयांचे उल्लंघन करुन होत असलेला वापर, तसेच घन कच-याचे एकत्रिकरण करण्याकरिता कायदयाची परवानगी आवश्यक असतानाही मुंबई महानगरपालिकेला राज्य पर्यावरण मंडळाकडून दिलेली बेकायदेशीर मान्यता, या परिसरातील खाडी आणि ठाणे खाडी परिसर हे स्थलांतरित पक्षांच माहेरघर, पेन्टेड स्टॉक, बदक इत्यादी पक्षांच निवास, लाखो स्थलांतरित पक्षी येथे वास्तव्यास येत असणे, परंतु येथील क्षेपणभूमीमुळे स्थलांतरित पक्षांवर देखील अन्य ठिकाणी स्थलांतरित होण्याची आलेली वेळ, क्षेपणभूमीवरिल कच-यावर कोणतीच प्रक्रिया केली जात नसल्याने परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे, बायारिॲक्टर लॅड फिल हे तंत्रज्ञान मनुष्य वस्तीपासून साधारण १० कि.मी अंतरावर राबविण्यात येते, सदरची क्षेपणभूमी मनुष्यवस्तीपासून केवळ २०० मीटरवर असणे, त्यामुळे हे तंत्रज्ञान म्हणजे केवळ धुळ फेकच असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी नागरिकांमध्ये शासनाबद्दल निर्माण झालेली चिडीची व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) श्री. सुभाष धोटे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील महानगरपालिकेच्या एफ/उत्तर विभागांतर्गत भाऊदासी मार्ग, माटुंगा (पूर्व), मुंबई -४०००१९ येथील सीएस क्र. ४१०/१० प्लॉट क्र.४२१, येथे प्रेम गिरिजा नामक इमारत विकासकाकडून बांधण्यात येणे, सदर विकासकाने इमारत बांधताना आवश्यक असणाऱ्या परवानग्या घेण्यात येणे, मुंबई महानगरपालिकेच्या मंजूर आराखड्यामध्ये ५ व्या मजल्यावर सेवा मजल्याची तरतूद करण्यात येणे, परंतु बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या सहकार्याने सेवा मजल्याची तरतूद करण्यात न येणे, विकासकाने मंजूर आराखड्याची पायमल्ली करून सदर सेवा मजल्यावर सदनिका बनवून विक्री करण्यात येणे, सदर विकासक व दोषी असलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर एमआरटीपी कायद्यांतर्गत कारवाई करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१०) श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"फलटण नगरपरिषदेचे तत्कालीन मुख्याधिकारी संजय गायकवाड, सहायक नगररचनाकार अजिंक्य पाटील, आवजावक लिपिक संतोष काकडे यांच्या कार्यकाळात सन २०२० मध्ये बिना किशोर नामदोशी यांनी फलटण शहर नगरभुमापन क्र.६४८६ ब/ १४७ ते १५० सर्व्हे नं. ३१ मिळकतीचे तात्पुरते रेखांकन मंजुरीसाठी देण्यात येणे, त्यावेळी मुख्याधिकारी संजय गायकवाड यांनी नामदोशी यांच्या अर्जाला मंजूरी देण्यात येणे, दिनांक ३१ जानेवारी, २०२४ रोजी

मुख्याधिकारी गायकवाड यांनी अचानक पुर्वीचा मंजूरीचा निर्णय बदलून रेखांकनास मंजूरी रद्द केल्याचा निर्णय दिल्याची बाब निदर्शनास येणे, त्यावर नामदोशी यांनी जिल्हाधिकारी सातारा यांच्याकडे तक्रार करुन न्यायाची मागणी करणे, सदर प्रकरणामध्ये जिल्हाधिकारी सातारा यांनी मुख्याधिकारी गायकवाड, सहायक नगररचनाकार पाटील आणि लिपिक काकडे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश सहायक आयुक्त, नगरविकास प्रशासन, शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांना आदेशित करण्यात येणे, नामदोशी यांच्या रेखांकन मंजूरी अर्ज प्रकरणात भ्रष्टाचार झाला असून संबंधीत मुख्याधिकारी गायकवाड, सहायक नगररचनाकार पाटील आणि लिपिक काकडे यांच्यावर तातडीने निलंबनाची कारवाई करणे आवश्यक असणे. सदर प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(११) ॲड. माणिकराव कोकाटे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील शेतकऱ्यांना त्यांची शेती सिंचनाखाली आणण्यासाठी सहकारी तत्वावर उपसा जलसिंचन योजनेची स्थापना केलेली असणे, अशा संस्थांच्या उपसा सिंचन प्रकल्पासाठी विविध बँकांनी कर्जपुरवठा केलेला असणे, त्यात प्रामुख्याने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा समावेश असणे, सहकारी तत्वावर कर्ज पुरवठा करतांना शेतकरी सभासदांच्या जमिनी तारण घेऊन ७/१२ उताऱ्यावर बोजाची नोंद केलेली असणे, त्यातच राज्यात सातत्याने अनियमित पावसाने दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण होऊन सिंचनाच्या स्त्रोतांचा ऱ्हास होणे व काही योजना सुरु होण्याआधी बंद पडणे, त्यामुळे शेतकरी संकटात सापडलेला असणे, त्यामुळे उपसा सिंचन संस्थांची थकीत कर्जमाफीची लोकप्रतिनिधी व शेतकरी वर्गाची सातत्याची मागणी असणे, त्यामुळे कुंडलवाडी विविध कार्यवाही संस्थेमार्फत श्रीरामकृष्ण गोदावरी सहकारी उपसा जलसिंचन संस्था मर्यादित, ता.वैजापूर,जि.छत्रपती संभाजीनगर या संस्थेचे थकीत कर्ज (मुद्दल) रुपये २०५.२७ लक्ष व इतर ४ योजनांना थकीत कर्ज (मुद्दल) रुपये ६४२६.५९ लक्ष माफ केलेले असणे, याच धर्तीवर गोदावरी उपसा सहकारी जलसिंचन योजना बारागाव पिंप्री, ता.सिन्नर, जिल्हयातील इतर उपसा जलसिंचन संस्थांचा कर्जमाफी योजनेत समावेश नसल्याने ८०५ शेतकरी सभासदांमध्ये तीव्र स्वरुपाचा असंतोष निर्माण झालेला असणे, त्यामुळे उक्त संस्थेच्या कर्जमाफी प्रमाणे याही संस्थांना कर्जमाफी देण्याची सभासदांची असलेली मागणी, परंतु यामागणीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१२) श्री. महेश शिंदे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मौजे वडगांव शेरी (ता.हवेली, जि.पुणे) येथील फेरफार नंबर ७२६ अन्वये कुठलेही हस्तांतरण वा संपादन नसतांना दोन जमिन मालकांना डावलून दि एक्सटिव्ह इंजिनिअर पी.डब्ल्यू.पुना सेंट्रल डिव्हीजन सेंट्रल गर्व्हमेंट दिल्लीपासून

मिलटरी मिट ड्रेशन फॅक्टरी यांनी हया कंपनीला खरेदी दिले असे दाखविण्यात येणे, सदर जमिनीचा कोणताही मोबदला जमिन मालकांना न देता कंपनीने संरक्षण खात्याची, मा.राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीची बनावट कागदपत्रे तयार करुन त्या शेतक-यांच्या जमिनी संरक्षण खात्याकडून स्वतः कंपनीने घेतल्याचे दाखविण्यात येणे, सदर घटनेत शासनासह शेतक-यांची फसवणूक झाल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, या प्रकरणी शासनाने तातडीने चौकशी करुन संबंधित दोषी प्रशासकीय अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१३) श्री. बबनराव यादव (लोणीकर), वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"घनसावंगी विधानसभा मतदारसंघात मोदी आवास योजना, रमाई आवास योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, यशवंतराव चव्हाण आवास योजनेचे जवळपास दहा हजार घरकुल मंजूर झालेले असणे, सदरहू घरकुलांच्या बांधकामांसह विकास कामांना वाळू मिळत नसणे, घनसावंगी तालुक्यातील रामसगाव, जोगलादेवी, शेवता, सौंदलगाव, बानेगाव, भोगाव, मुद्रगाव, मंगरूळ या गावातील गोदापात्रातून निविदा झालेली नसतांना अवैधरित्या वाळूचा उपसा गेल्या अनेक दिवसांपासून बिनधास्तपणे सुरू असल्याने येथील वाळू माफियांचा मोठ्या प्रमाणावर सुळसुळाट झाल्याचे दिसणे, वाळूने भरलेल्या हायवा तीर्थपुरी, घनसावंगी, कुंभार पिंपळगाव, शहागड आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाळूची दिवसा ढवळ्या व भरधाव वेगाने वाहतुक केली जात असणे, मात्र येथील महसूल तसेच तीर्थपुरी व गोंदी पोलीस स्टेशनचा कोणताही धाक न बाळगता या हायवा भरधाव वेगाने सुरू असणे, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार घनसावंगी, तहसीलदार अंबड, पोलीस ठाणे तीर्थपुरी व गोंदी येथील पोलीस निरीक्षक हे सर्रास हप्ते घेऊन वाळू चोरांना संरक्षण देत असल्याबाबत अनेक तक्रारी असणे, गोदा पात्रातील वाळू चोरांनी केलेल्या खड्ड्याची मोजणी करून तहसीलदार घनसावंगी, तहसीलदार अंबड, पोलीस निरीक्षक तीर्थपुरी आणि गोंदी यांच्याविरुद्ध योग्य ती कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१४) श्री.प्रकाश सोळंके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नवीन भूसंपादन आधिनियम २०१३ दिनांक १ जानेवारी, २०१४ रोजी पासून अंमलात येणे, राज्यातील दिनांक १ जानेवारी, २०१४ रोजी प्रलंबित असलेल्या भूसंपादन प्रकरणात बाजारमूल्य निर्धारणाकरिता केंद्र शासनाच्या निर्देशानुसार दिनांक १ जानेवारी, २०१४ हा दिनांक विचारात घेण्याबाबत विधी व न्याय विभागाच्या सहमतीने दिनांक ६ मार्च, २०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये निर्णय घेणे, सदर निर्णय सामान्य जमिन धारक/शेतकरी/बाधित कुटूंब यांच्या हितासाठी आणि भारतीय संसदेच्या स्थायी समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारे घेण्यात आलेला

असणे, सदर घेतलेल्या निर्णयाच्या परिणामकारक अमंलबजावणीकरिता वैधानिकरित्या भूसंपादन नियम-२०१४ चे कलम १९ मध्ये सुधारणा करण्यासाठी सन २०१९ पासून लोकप्रतिनिधी यांनी मागणी करणे, ४ वर्षाच्या पाठपुराव्यानंतर विधी व न्याय विभागाच्या मंजुरीने व महसूल मंत्री यांच्या मान्यतेने नियम दुरूस्तीसाठी दिनांक १ मार्च, २०२३ रोजीच्या राजपत्रात सुचना-हरकतीसाठी प्रारूप नियम प्रसिद्ध होणे, परंतु सदर नियमास अंतिम मंजुरी देण्यासाठी मागील १ वर्षापासून विभागाच्या स्तरावर हेतुपुरस्सर विलंब करणे, लोकप्रतिनिधी व मा. मंत्री यांना न जुमानता संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मनमानी कार्यपध्दतीमुळे नियम अंतिम न होणे, यामुळे सामान्य भूधारक वेठीस धरले जात असणे, सर्वोच्च न्यायालयाने याबाबत अनेक निर्णय दिलेले असणे, राज्य शासनाने सुध्दा याबाबत निर्णय घेतलेला असतानासुध्दा अमंलबजावणी करण्यास टाळाटाळ होत असणे, यामुळे सामान्य भूधारकांमध्ये लोकप्रतिनिधी, शासन यांच्याबद्दल अविश्वासाचे वातावरण निर्माण होऊन प्रतिमा मलिन होणे, त्यामुळे सदर नियमांस अंतिम मंजुरी देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१५) डॉ. भारती लव्हेकर, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-**

"मुंबईमध्ये जवळपास ३४ कोळीवाडे असून लहान व मोठे मिळून एकूण ६० कोळीवाडे असणे, सदर कोळीवाडयांच्या सिमांकनाचा प्रश्न अजूनही प्रलंबित असणे, काही ठिकाणी सिमांकनाचे काम अर्धवट झालेले असणे, सदर कोळीवाडयांच्या सिमांकनाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता, जेणेकरुन या कोळीबांधवांवर अन्याय होणार नाही या दृष्टीने तसेच कोळीवाडयांच्या विकासासाठी वेगळा DCR काढण्यासंदर्भात त्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१६) डॉ. विनय कोरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"चांदोली अभयारण्य प्रकल्पबाधितांचे महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाच्या दिनांक ३१ मार्च १९९५ रोजीच्या शासन निर्णयानुसार कोल्हापूर, सांगली, सातारा व रत्नागिरी जिल्ह्यातील मिळून २१ गावांचे कुटुंब संख्या अंदाजे १७०० इतकी स्थलांतर करून पुनर्वसन त्या त्या जिल्ह्यात करणे, प्रकल्प बाधितांना स्थलांतरित ठिकाणी पुनर्वसन कायद्याप्रमाणे भूखंड व नागरी सुविधा काही प्रमाणात गावठाण करून पुरविण्यात आलेल्या असणे, प्रकल्प बाधितांमधील ७० टक्के लोकांना महसूल व वन विभागातील अधिकाऱ्यांच्या समन्वयाअभावी व पुनर्वसन अधिनियम १९९९ मधील कलम ११ व कलम १३ अधिसूचना नसल्यामुळे ३० वर्षे होत आली तरी जमिनीची व नागरी सुविधांची पूर्तता झालेली नसणे,

सन २०२१ पर्यंत पाटबंधारेमधील वारणा व दूधगंगा प्रकल्पातील जमिनी वाटप करण्यात आलेल्या असणे, सदर प्रकल्प हा सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामध्ये समाविष्ट झाल्यामुळे सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाची अधिसूचना लागू करणे आवश्यक असणे, परंतु महसूल व वन विभागातील अधिकारी यांच्यातील योग्य समन्वयाअभावी प्रकल्पाचे पुनर्वसनाचे काम प्रशासकीय स्तरावर थांबलेले असणे, त्यामुळे प्रकल्पबाधितांमध्ये पसरलेले नैराश्याचे वातावरण, या प्रकरणात शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची व पुनर्वसन प्रक्रिया गतिमान करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१७) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात सीईटी परिक्षेच्या रजिस्ट्रेशन व अ‍ॅडमिशनमध्ये सीईटी सेल २०२१ मध्ये गैरव्यवहार झाला असून सीईटी सेलमध्ये एडसपार्क इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेडने बनावट कागदपत्रे सादर करणे, दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी निविदेमध्ये एडसपार्क इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेडने तीच बनावट कागदपत्रे सादर करणे, सीईटीचे प्रशासन अधिकारी यांच्या मार्गदर्शनासाठी सीएपी (सामान्य प्रवेश प्रक्रिया) या विद्यमान विक्रेत्यांसह सीईटी सेलच्या निविदांसाठी एक कार्टेल तयार करुन निविदामध्ये फेरफार करणे, सेल विशिष्ट कंपनीला नियुक्त करणे, या कंपनीमध्ये प्रशिक्षीत कर्मचा-यांचा अभाव असणे, एमबीए सारख्या परिक्षेत मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला असतानाही अशी बनावट कंपनीची नियुक्ती करणे, या कंपनीकडे अनुभवाची खोटी कागदपत्रे असणे, त्यामुळे सीईटी विद्यार्थ्यांना परिक्षा फीमध्ये जादाचे पैसे भरावे लागत असून या सर्व प्रकारामध्ये मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्यामुळे विद्यार्थी, पालक व जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन सदर प्रकरणांतील दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता व उपाययोजना."

**(१८) श्री. बाळासाहेब आजबे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"आष्टी विधानसभा मतदार संघातील, मौजे नफरवाडी (ता.पाटोदा, जि.बीड) येथे जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामात अनेक त्रुटी असुन देखील निविदा प्रसिद्ध करणे, सदरचे काम हे मे. आरोही सोल्युशन या ठेकेदाराकडून वेळेत पूर्ण न झाल्याने कार्यकारी अभियंता, जि. प. बीड यांचेकडून दिनांक २३ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास रदद् करण्यात येणे, कार्यारंभ आदेश रदद् करून फेर सर्व्हेक्षणाचे आदेश देण्यात येणे, आरोही सोल्युशन च्या नावाने कार्यारंभ आदेश रदद् केलेले असतांना २० लाख रुपयांचे बील देण्यात येणे, निविदा भरण्याची सक्षमता (बिड कॅपॅसीटी) नसतांना देखील मे. आरोही सोल्युशनला आष्टी विधानसभा मतदार संघातील ५४ व बीड जिल्ह्यातील एकूण ५८ कामांचे एकूण ९४ कोटी ७८ लाख ९६ हजार १६३ रुपयांचे संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने टेंडर देण्यांत येणे, ही सर्व कामे बोगस असल्याने ह्या

कामांची क्वालिटी कंट्रोल मार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, यामध्ये अधिकारी वर्गाच्या संगनमताने होणारा गैरकारभार, निविदा काढणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व मे. आरोही सोल्युशनची कागदपत्रांची तपासणीसह चौकशी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१९) सर्वश्री. विजय वडेट्टीवार, सुरेश वरपुडकर, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री. अस्लम शेख, अमित झनक, सुभाष धोटे, संजय जगताप, विक्रमसिंह सावंत, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मौजे वळणई, मालाड (प.), मुंबई न.भु.क्र. ३०७/६६ए या जागेत मालाड शिवशक्ती एस.आर.ए.सह गृह संस्थेच्या माधमातून धोबी कामगारांसाठी एकूण १८ संस्थांसाठी सदनिका मंजूरीबाबत निर्णय घेण्यात येणे, महानगपालिका सहाय्यक आयुक्त, पी/उत्तर यांनी विकासक मे.ए.एस.के.कॉर्पोरेशन यांना आरक्षित जागेत २००० अनधिकृत झोपड्यांचे बांधकाम करण्यास पाठबळ देऊन झोपड्यांचे पुनर्वसन होण्यास प्रस्ताव झो.पु.प्रा.कार्यालयास सादर करुन मालकी हक्काची परवानगी न घेता एकूण १३१० झोपड्यांचे परिशिष्ट-२ व नकाशा मंजूर करुन घेणे, यासंदर्भात सहाय्यक आयुक्त, मालमत्ता विभाग, मुंबईमहानगरपालिका यांनी दिनांक ९ मे, २००६ रोजी कार्यकारी अभियंता झो.पु.प्रा. यांना शिवशक्ती योजनेस स्थगिती देण्याचे आदेश दिले असतानाही विकासक ए.एस.के.कॉर्पोरेशन यांनी मोकळ्या जागेत अनधिकृतरित्या ४ इमारतींचे बांधकाम करणे तसेच झो.पु.प्रा.ने ए.एस.के.कोर्पोरेशन यांचे आशयपत्र व अतिक्रमित जमिनीत इमारतीचा नकाशा मंजूर करणे, उपमुख्य अभियंता झो.पु.प्रा. व कार्यकारी अभियंता यांनी अतिक्रमित जमिन व बेकायदेशीर इमारतीवर कारवाई न करता संगनमत करुन संरक्षण देणे, तद्नंतर महानगरपालिकेनेही या जागेत अतिक्रमण असतानाही रक्कम भरणा करण्याचे आदेश देऊन जमिनीला संरक्षण देणे, या प्रकरणी सदर झोपू योजना महानगरपालिकेची परवानगी न घेता मंजूर झाली असून धोबीघाट कामगार यांना हक्काची घरे न देता झो.पु.प्रा. व महानगरपालिका यांनी विकासकाशी संगनमत करुन जमिनीची अवैध विक्री केलेली असणे, याबाबत सखोल चौकशी करुन संबंधित विकासक, झोपडपट्टी पुनर्वसन विभागाचे व महानगरपालिकेचे दोषी अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२०) श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"श्री. साईबाबा शिर्डी संस्थानच्या आस्थापनेवर काम करीत असलेल्या ५९८ कामगारांपैकी जे कामगार पात्र आहेत त्यांना दिनांक ०७ ऑगस्ट, २००९ च्या शासन मान्य आकृती बंधानुसार कलम १६ अन्वये या कर्मचाऱ्यांना कायम प्रस्ताव पूर्वलक्षी प्रमाणे तातडीने शासनाने मंजूर करण्याबाबत मा. उपमुख्य मंत्री यांनी

अप्रकाशित प्रत

माहे मार्च, २०२३ मध्ये सभागृहात उत्तर देताना तत्वत: मान्य असल्याचे सांगण्यात येऊन अधिवेशन संपल्यानंतर लगेच या विषयावर बैठक घेण्याचे आश्वासन देण्यात येणे, परंतु अद्याप या विषयावर कोणतीही बैठक घेण्यात न येणे, ५९८ कामगारांपैकी काही कामगारांचा मृत्यू झाला तर काही कामगार सेवानिवृत्त झाले असणे, परंतु उर्वरित कामगारांना अद्यापी न्याय मिळाला नसल्याचे आढळून येणे, यामुळे कामगारांमध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाच्या दिनांक ०९ मे,२०२४ च्या आदेशानुसार शासन व संस्थान यांनी सदरहू कामगारांना न्याय देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२१) सर्वश्री. श्यामसुंदर शिंदे, मोहनराव हंबर्डे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नांदेड जिल्ह्यात सोयाबीन पिकावर यलो मोझॅक विषाणूजन्य रोग, खोडकुज व मूळकूज या बुरशीजन्य रोगामुळे पिकाला बाधा झालेली असणे, याबाबत राज्य शासनाच्या निर्देशानुसार महसूल, कृषी आणि मदत व पुनर्वसन विभागांनी संयुक्तपणे पंचनामे करणे, यात नांदेड जिल्ह्यातील कंधार, लोहा, मुदखेड, नायगाव व नांदेड या तालुक्यातील २ लाख ११ हजार ४४९ शेतकऱ्यांच्या ९३ हजार ६८६ हेक्टर क्षेत्राला बाधा पोचल्याचा अहवाल कृषी आयुक्तालयास पाठविला असताना देखील महसूल, कृषी, मदत व पुनर्वसन विभागाकडून अद्याप शेतकऱ्यांना भरपाई पासून वंचित रहावे लागणे, त्याचप्रमाणे माहे जून-जुलै २०२३ मध्ये अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या कंधार व लोहा तालुक्यातील शेतकरी वगळून ६ लाख १७ हजार ९११ शेतकऱ्यांना भरपाईसाठी ४२० कोटी ४६ लाख मंजूर झालेली असणे, सदरहू भरपाई सध्या शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होत असणे, तर दूसरी कडे मात्र कंधार व लोहा तालुक्यातील शेतकऱ्यांना भरपाई पासून वंचित राहावे लागत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

**सहा : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० – महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक, २०२४

**(२)** सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ – महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा विधेयक, २०२४

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० – महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक, २०२४

**(२)** सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ – महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा विधेयक, २०२४

---

(क) **विधानपरिषदेने संमत केल्यास विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(१) सन २०२४ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ४ – महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०२४

(२) सन २०२४ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ – महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक, २०२४

**सात : (बुधवार, दिनांक १० जुलै, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, भरतशेट गोगावले, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री शिवेंद्रसिंह भोसले, प्रताप सरनाईक, दिलीपराव बनकर, ॲड. राहुल कुल, श्री. संजय शिरसाट, डॉ. संजय कुटे, श्री. नितेश राणे, डॉ. संजय रायमूलकर, ॲड. आशिष शेलार, श्री. प्रकाश आबिटकर, श्रीमती सरोज अहिरे, श्री.बबनराव लोणीकर, ॲड. शहाजीबापू पाटील, सर्वश्री दत्तात्रय भरणे, संतोष दानवे, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री प्रशांत ठाकूर, महेश बालदी, रत्नाकर गुट्टे, नारायण कुचे, चिमणराव पाटील, सुभाष देशमुख, संजय गायकवाड, सदानंद सरवणकर, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री रमेश बोरनारे, शांताराम मोरे, राणाजगजितसिंह पाटील, सुहास कांदे, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री संभाजी निलंगेकर-पाटील, महेश शिंदे, ज्ञानराज चौगुले, हरिभाऊ बागडे, चंद्रकांत निंबा पाटील, श्रीमती लताबाई सोनावणे, सर्वश्री प्रकाश सुर्वे, बच्चू कडू, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री जयकुमार गोरे, दिलीप लांडे, श्रीमती गिता जैन, सर्वश्री भिमराव तापकीर, योगेश कदम, बालाजी कल्याणकर, डॉ. राहूल आहेर, श्री. महेंद्र दळवी, सर्वश्रीमती मोनिका राजळे, श्वेता महाले, श्री. राजेश पवार, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री महेश लांडगे, अमित साटम, सिध्दार्थ शिरोळे, राम कदम, श्रीनिवास वनगा, अभिमन्यू पवार, सुनिल राणे, ॲड.लक्ष्मण पवार, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री चेतन तुपे, यशवंत माने, दिपक चव्हाण, राम सातपुते, जयकुमार रावल, नरेंद्र भोंडेकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री विजयकुमार देशमुख, कालीदास कोळंबकर, किशोर पाटील, ॲड.राहूल ढिकले, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, सर्वश्री हरिष पिंपळे, प्रकाश भारसाकळे, सुरेश भोळे, मंगेश कुडाळकर, डॉ. पंकज भोयर, ॲड. आशिष जैस्वाल, श्रीमती देवयानी फरांदे, श्री. किशोर जोरगेवार, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री राजेंद्र पाटील-यड्रावकर, समाधान अवताडे, योगेश सागर, किसन कथोरे, संजय केळकर, गणेश नाईक, महेंद्र थोरवे, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री अतुल भातखळकर, संतोष बांगर, श्रीमती अश्विनी जगताप, सर्वश्री शेखर निकम, प्रशांत बंब, डॉ. संदीप धुर्वे, सर्वश्री किर्तीकुमार भांगडीया, मंगेश चव्हाण, नामदेव ससाणे, डॉ. देवराव होळी,**

अग्रिम प्रत

**सर्वश्री समीर कुणावार, दादाराव केचे, राजेश पाटील, विनोद अग्रवाल, सुनिल शेळके, सुनिल टिंगरे, प्रकाश सोळंके, प्रकाश आवाडे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील शेतकरी व सर्वसामान्य जनतेचे कल्याण हे एकमेव ध्येय समोर ठेवून व नारी शक्ती आणि युवा शक्तीला प्राधान्य देऊन 'शासन आपल्या दारी' या अभियानाच्या माध्यमातून महाराष्ट्र गतीमान ठेवण्याचा, जनकल्याणाचा वसा घेतलेल्या या शासनाचा प्रयत्न असणे, राज्यात एकीकडे दुष्काळाची होरपळ तर दुसरीकडे वादळी पाऊस, गारपीटीचा कहर सुरु असणे, खरेतर उन्हाळी तसेच रब्बी आणि खरीप अशा तिन्ही हंगामांवर नैसर्गिक आपत्तींनी घाला घातला असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे शेत पिकांचे खुप नुकसान झाले असल्याची वस्तुस्थिती असणे, राज्यात कमी पाऊस असलेल्या आणि जनावरांचा चा-याचा प्रश्न निर्माण झालेल्या राज्यातील १२४५ महसुली मंडळात चारा छावण्या उभारण्यास शासनाने परवानगी दिली असणे, कांद्याला योग्य भाव मिळावा याकरिता कांद्याचे दर ठरविण्याचे अधिकार केंद्राच्या ग्राहक संरक्षण मंत्रालयाने स्वतःकडे ठेवले असणे, स्वर्गीय वसंतराव नाईक शेती स्वावलंबी मिशनला मजबुत करुन शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी टास्क फोर्सला बळकट करण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, कापसासाठी ५०० व सोयाबीनसाठी २७० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असणे, धानाला २० हजार रुपये बोनस देण्याचा निर्णय घेतल्याने त्याचा ६ लाख शेतक-यांना लाभ मिळू शकेल अशी तरतूद करण्यात येणे, शेतक-यांकरिता 'नमो शेतकरी महासन्मान निधी' योजना राबविण्यासाठी ५ हजार ७०० कोटींची तरतूद करुन त्याचा पहिला हप्ता शेतक-यांच्या बँक खात्यात जमा झाल्याचे निदर्शनास येणे, नुकसानीचे पंचनामे जलद व पारदर्शी होण्यासाठी ई- पंचनामा प्रणाली संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली असणे, शेतकऱ्यांना दिवसा अखंडीत वीज पुरवठा करण्यासाठी 'मागेल त्याला सौरऊर्जा पंप' उपलब्ध करुन देण्याचा शासनाने निर्णय घेतला असणे, केवळ १ रुपयात पिक विमा योजना राबविण्यात येत असल्याने खरीप हंगामासाठी राज्यातील १ कोटी ७० लाख व रब्बी हंगामासाठी ६६ लाख अशा एकूण २ कोटी ३६ लाख शेतकऱ्यांनी पिक विमा योजनेत विक्रमी सहभाग नोंदविला असल्याचे निदर्शनास येणे, शेतक-यांना दिलासा देण्याकरिता एनडीआरएफच्या दराच्या दुप्पट दराने शेतक-यांना मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानाकरिता ७,१९६ कोटी रुपये इतका निधी मंजूर केला असणे, कमी पाऊस झालेल्या राज्यातील १,०२१ महसूल मंडळात दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात येऊन तेथील शेतकऱ्यांना कर्जाचे पुनर्गठन, चालू वीज बिलात ३३.५ टक्के सूट यासारख्या विविध ८ सवलती लागू करण्यात आल्या असल्याचे निदर्शनास येणे, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत पहिल्या टप्प्यात ४ हजार कोटी रुपयांचा निधी वाढवून आता ५४६९ कोटी एवढा करण्यात आला असणे, राज्यात प्रथमच कांदा महा बँक हा पथदर्शी प्रकल्प सुरु करण्यात आला असणे, विदर्भातील नागपूर, काटोल, कळमेश्वर, मोर्शी, बुलढाणा येथे आधुनिक संत्र प्रक्रिया केंद्रे उभारण्याकरिता सुमारे २० कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली असल्याचे निदर्शनास येणे, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतील २१२९ लाभार्थ्यांना ७ कोटी ५१ लाख रुपयांचा निधी दिला असल्याचे निदर्शनास येणे,

'मागेल त्याला शेततळे' योजनेचा विस्तार करून मागेल त्याला फळबाग, मागेल त्याला ठिंबक व तुषार सिंचन, मागेल त्याला शेततळ्याचे अस्तरीकरण, मागेल त्याला आधुनिक यंत्रे, कॉटन श्रेडर इ. देण्याचा निर्णय करुन त्याकरिता १ हजार कोटी यावर्षी खर्च करण्याचा शासनाचा मानस असणे, पारंपारिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत शेतकरी वर्गाचा आर्थिक आधार बळकट करण्याकरिता मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प राज्यात कार्यान्वित केला असणे, त्यायोगे राज्यातील लहान आणि सिमांत शेतकरी तसेच कृषी नवउद्योजकांना केंद्रस्थानी ठेऊन शेतमालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी शेतकरी ते खरेदीदार अशी मूल्यसाखळी विकसित करणे हा या प्रकल्पाचा उद्देश असणे, कृषी, शिक्षण, संशोधन आणि विद्यापीठांची संरचना आणि कार्यपध्दती अभ्यास करण्यासाठी माजी कुलगुरु डॉ. राजाराम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असणे, राज्यातील सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याचे प्रस्तावित असून त्यायोगे २ वर्षांत ६१ सिंचन प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित असणे, वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प कार्यान्वित केल्याने नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला व बुलढाणा जिल्हयातील सुमारे ३ लाख ७१ हजार २७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणे, जलयुक्त शिवार अभियानांकरिता ६०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली असणे, स्वच्छ व हरित ऊर्जेचे ध्येय साध्य करण्यासाठी जनाई-सिरसाई, पुरंदर यासह सर्व शासकीय उपसा जलसिंचन योजनाचे सौर उर्जीकरण करण्यात येत असून त्याकरिता ४ हजार २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असणे, म्हैसाळ, जि. सांगली येथे पथदर्शी सौरऊर्जा प्रकल्प राबविण्यात आल्याने सांगली आणि सोलापूर जिल्हयातील सुमारे ७५ हजार शेतकरी कुटुंबियांना याचा लाभ मिळाला असणे, कोल्हापूर आणि सांगली जिल्हयातील पुरामुळे होणारी जिवित व वित्तहानी टाळण्याकरिता आणि अतिरिक्त पाणी दुष्काळग्रस्त भागात वळविण्याकरिता जागतिक बँकेच्या सहाय्याने ३ हजार २०० कोटी रुपये किंमतीचा महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबविण्यात येणे, राज्यात गरजू महिलांना ओळखण्यासाठी व त्यांना सक्षम करण्यासाठी 'नारी शक्ती दुत ॲप' हे एक क्रांतिकारी ॲप्लीकेशन राबविण्यात येत असणे, राज्यातील महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन आणि उद्योजकता विकासासाठी सक्षम करण्याकरिता 'पंतप्रधान नमो महिला सशक्तीकरण अभियान' राबविण्यात येत असणे, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना' राबविण्यात येऊन त्यायोगे २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, 'शुभमंगल सामुहिक नोंदणीकृत विवाह' योजनेत लाभार्थी मुलांना देण्यात येणारे अनुदान १० हजार रुपयांवरुन २५ हजार रुपये करण्यात येणे, 'मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना' या माध्यमातून पात्र कुटुंबाला वर्षाला ३ गॅस सिलेंडर मोफत देण्याचे घोषित करण्यात आले असणे, महिला बचत गटानी उत्पादित केलेल्या वस्तूंना 'उमेद मार्ट' आणि 'ई-कॉमर्स ऑनलाईन प्लॅटफॉर्म' याद्वारे यावर्षात २५ लाख महिलांना लखपती करण्याचा उद्देश शासनाने ठेवला असणे, सन २०२४-२५या शैक्षणिक वर्षापासून मुलींना मोफत उच्च शिक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, प्रतिवर्षी १० लाख तरुण-तरुणींना प्रत्यक्ष कामावरील प्रशिक्षण देण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' राबविण्यात येत असणे, मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, यवतमाळ, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, कराड, अवसरी खुर्द, जि. पुणे येथील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये 'सेंटर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्यात येणार असणे, राज्यातील बार्टी, सारथी, महाज्योती,

अमृत इ. संस्थांमार्फत एकूण २ लाख ५१ हजार ३९३ विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्यात आले असून त्यायोगे ५२ हजार ४०५ विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी प्राप्त झाल्या असणे, महापे, नवी मुंबई येथे २५ एकर जागेवर 'इंडिया जॅम्स ॲन्ड ज्वेलरी पार्क' उभारुन त्यायोगे १ लाख रोजगार निर्मिती करण्याचा शासनाचा प्रयत्न असणे, सिंधुदुर्ग जिल्हयात स्थानिकांना रोजगार उपलब्ध करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्कुबा डायव्हिंग केंद्र उभारण्याकरिता २० कोटी रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली असणे, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार विकास महामंडळामार्फत ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी ८२ शासकीय वसतीगृहे स्थापन करण्यास शासनाने मंजुरी दिली असणे, राज्यात पर्यटनाला चालना देण्यासाठी शाश्वत पर्यटन धोरण आखण्यात येत असणे, राज्यातील ५० नवीन पर्यटन स्थळांची निवड करून त्या ठिकाणी थीम पार्क, ॲडव्हेंचर स्पोर्ट, शॉपिग मॉल, वॉटर मॉल आणि निवास व्यवस्था करण्यात येत असणे, बुलढाणा येथील लोणार, अंजिठा-वेरुळ, कळसूबाई, त्र्यंबकेश्वर तसेच कोकणातील सागरी किल्ल्याच्या ठिकाणी पर्यटकांसाठी उच्च दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यात येत असणे, सातारा येथील शिवसागर जलाशय, भंडाऱ्यातील गोसीखुर्द जलाशय तसेच जळगाव येथील वाघुर जलाशय येथे नाविन्यपूर्ण जलपर्यटन प्रकल्प राबविण्यात येत असणे, कोकणातील पर्यटनास चालना देण्यासाठी शिवकालीन ३२ गडकिल्ल्यांचे नुतनीकरण व संवर्धन करण्याचे प्रस्तावित असणे, राज्यातील पर्यटकांना व भाविकांना योग्य दरामध्ये उत्तम व सुरक्षित सुविधा पुरविण्यासाठी श्रीनगर, जम्मू काश्मीर आणि अयोध्या येथे महाराष्ट्र भवन बांधण्याचा निर्णय घेतला असणे, शिवछत्रपतींचा पूर्णाकृती पुतळा राज्याच्या सीमेवर बांधणे, शिवछत्रपतींची वाघनखे राज्यात आणणे, बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजनेमध्ये समाविष्ठ १४० चाचण्यांमध्ये वाढ करणे तसेच, आपला दवाखाना योजनेची व्याप्ती वाढवून ती मुंबईबाहेरही राज्यभर करण्याची आवश्यकता, विकसित महाराष्ट्राचा ध्यास घेऊन राज्यात शेतकरी, शेतमजूर, महिला व युवकांना बळकट करण्यासाठी व लोककल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ** : **(बुधवार, दिनांक १० जुलै, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, अजय चौधरी, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले, सुरेश वरपुडकर, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री सुनिल प्रभू, राजन साळवी, डॉ.नितीन राऊत, श्री.अमीन पटेल, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री.अमित देशमुख, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री संग्राम थोपटे, रमेश कोरगावकर, प्रकाश फातर्पेकर, श्रीमती ऋतुजा लटके, सर्वश्री सुनिल भुसारा, अस्लम शेख, राजेश टोपे, संजय जगताप, प्राजक्त तनपुरे, ॲड. के.सी.पाडवी, सर्वश्री अनिल देशमुख, कुणाल पाटील, बाळासाहेब पाटील, शिरीषकुमार नाईक, राजेश एकडे, शिरीष चौधरी, अमित झनक, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री विकास ठाकरे, सहसराम कोरोटे, माधवराव जवळगावकर-पाटील, सुभाष धोटे, रणजित कांबळे, मोहनराव हंबर्डे, कैलास गोरंटयाल, जितेश अंतापूरकर, रविंद्र धंगेकर, विक्रमसिंह सावंत, लहु कानडे, धीरज देशमुख, ऋतुराज पाटील, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री राजू आवळे,**

**हिरामण खोसकर, झिशान सिद्दीकी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यातील कमालीची ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, हत्या, बलात्कार, अपहरण, दरोडे, घरफोड्या, भ्रष्टाचार यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात शासनाला आलेले अपयश, गुन्हेगारांवर वचक बसण्याऐवजी त्यांचे वाढलेले मनोधैर्य, महिलांवरील लैंगिक अत्याचारात झालेली वाढ, नागपूर शहरातून तीन वर्षात सुमारे ११९५ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याने उपराजधानीतील पालकांमध्ये पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, पुण्यात वाढत असलेले ड्रग्ज, पब, अवैध बार याकडे गृह तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे तरुणांमध्ये वाढत असलेली व्यसनाधिनता व गुन्हेगारी, पुणे शहरात कोयता गँग व इतर गुन्हेगारीने उच्छाद मांडला असून कल्याणीनगर हिट अँड रन प्रकरणानंतर शहरामध्ये कायदा व सुव्यवस्थेवर निर्माण झालेले प्रश्नचिन्ह, पुण्याच्या हिट अँड रन प्रकरणी पोलिसांची व ससून रुग्णालय प्रशासनाची संशयास्पद भूमिका, आरोपी बिल्डर पुत्राला वाचविण्यासाठी ससून रुग्णालयातील डॉक्टरांनी रक्त नमून्यामध्ये फेरफार केल्याचे निदर्शनास येणे, गडचिरोली जिल्ह्यातील बारसेवाडा येथे जादूटोणा केल्याच्या संशयातून एका पुरूषासह महिलेस जिवंत जाळून ठार केल्याची घडलेली धक्कादायक घटना, कोपर्डी येथे मागासवर्गीय तरुणाला जातिवाचक शिवीगाळ करुन नंतर नग्न करुन मारहाण केल्याने संबंधित तरुणाने केलेली आत्महत्या, राज्यात वकिलांवर होत असलेले प्राणघातक हल्ले, राहुरी येथील पाच लाखांच्या खंडणीसाठी आरोपींनी वकील दाम्पत्याचे अपहरण करुन केलेल्या हत्येमुळे राज्यात कायदा सुव्यवस्थेचा उडालेला बोजवारा, कायद्याचा वचक न राहिल्याने विद्यमान लोकप्रतिनिधींनी पोलीस ठाण्यात केलेला गोळीबार व दहिसर येथे माजी नगरसेवकाची करण्यात आलेल्या हत्येचा तपास अद्यापही पूर्ण न झाल्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना, इंदापूरचे तहसिलदार व रत्नागिरीचे उपजिल्हाधिकारी यांच्यावर वाळू माफियांकडून झालेला भ्याड हल्ला, एका महिला पत्रकाराने राजकीय पक्षाच्या उमेदवाराबाबत बातमी छापल्याने गुंडांनी त्यांना धमकविल्याचा निदर्शनास आलेला निंदनीय प्रकार, मराठा आंदोलकांवर आंदोलन मागे घेण्यात येऊन असंख्य गुन्हे दाखल करण्यात येणे, जालन्यात एका कुटुंबावर हल्ला करून त्यांचे घर पाडल्याचा उघडकीस आलेला प्रकार, मिरा-रोड येथील लोकप्रतिनिधींनी पालिकेच्या कनिष्ठ अभियंत्यास केलेली मारहाण, हिंगोलीच्या लोकप्रतिनिधींनी महावितरण कर्मचाऱ्यास फोनद्वारे दिलेली धमकी, यामुळे प्रशासनाचे मनोधैर्य खच्चीकरण होत असल्याने जनसामान्यात शासनाविषयी पसरत असलेली असुरक्षिततेची भावना, राज्यातील पोलिसांच्या अंतर्गत समस्यांचे निवारण न होणे, वीस-बावीस तास काम करणारे पोलिस कर्मचारी, त्यांच्या निवासाचे प्रश्न, मानसिक आरोग्य आणि मानसिक आरोग्याअभावी निर्माण होणारे अन्य प्रश्नांकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, राज्यात अंमली पदार्थांचा झालेला सुळसुळाट, गुटखा, विदेशी सिगारेट, ई-सिगारेट व तत्सम बंदी असलेल्या पदार्थांची बेकायदेशीररित्या ठिकठिकाणी सुरू असलेली विक्री, राज्यातील नगरपालिका/महानगरपालिकांमध्ये वाढत चाललेला भ्रष्टाचार, मुंबई महानगरपालिका, MSRDC आणि MMRDA मध्ये प्रकल्पाच्या किंमतीमध्ये केलेली छुपी वाढ, फुगविलेले अंदाजपत्रक व केलेला भ्रष्टाचार, सिडकोमध्ये होत असलेला भ्रष्टाचार, कौशल्य विकास व

उद्योजकता विभागामध्ये सुरु असलेले घोटाळे, आदिवासी विकास विभागातील भ्रष्टाचार, सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये सुरु असलेले गैरव्यवहार व भ्रष्टाचाराचा उद्रेक, अन्न व औषध प्रशासनामधील भ्रष्टाचार, अटल सेतूच्या कामातील अनियमितता, झोपडपट्टयांमधील स्वच्छतेच्या निविदेत कोट्यवधी रुपयांची अनियमितता, नाशिकच्या देवळाली शिवारातील टीडीआर घोटाळा, मुंबई महानगरपालिकेत वाढत असलेला भ्रष्टाचार, नगरविकास विभागांतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त निधी अखर्चित राहणे, राज्यात औद्योगिक क्षेत्रांमधील कारखान्यांमध्ये सुरु असलेली स्फोटांची मालिका व त्यामुळे मोठ्या प्रमाणात झालेली वित्त व जीवितहानी, रासायनिक कंपन्यांमधून रसायनयुक्त पाणी प्रक्रिया न करताच नद्यांमध्ये सोडले जात असल्यामुळे होणारे जलप्रदूषण, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**नऊ : (बुधवार, दिनांक १० जुलै, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**ॲड. आशिष शेलार, श्री. भरतशेट गोगावले, डॉ. राजेंद्र शिंगणे, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री सदानंद सरवणकर, राजू कारेमोरे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री संजय शिरसाट, चंद्रकांत नवघरे, मोहन मते, मंगेश कुडाळकर, दिलीपराव बनकर, रणधीर सावरकर, प्रताप सरनाईक, श्रीमती सरोज अहिरे, श्री. हरिभाऊ बागडे, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री दौलत दरोडा, अतुल भातखळकर, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री सुनिल शेळके, संजय केळकर, प्रकाश सुर्वे, चेतन तुपे, संभाजी निलंगेकर-पाटील, दिलीप लांडे, गणेश नाईक, प्रकाश सोळंके, विश्वनाथ भोईर, सुनिल राणे, योगेश सागर, विकास कुंभारे, संग्राम जगताप, श्रीमती गिता जैन, सर्वश्री बाबसाहेब पाटील, प्रदीप जैस्वाल, यशवंत माने, ॲड. आशिष जैस्वाल, सर्वश्री दिपक चव्हाण, सुहास कांदे, मदन येरावार, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री किसन कथोरे, शेखर निकम, रमेश बोरनारे, संजय गायकवाड, डॉ. संजय रायमूलकर, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री मिहिर कोटेचा, राम कदम, नितेश राणे, अभिमन्यू पवार, राम सातपुते, सचिन कल्याण-शेट्टी, विनोद अग्रवाल, नरेंद्र भोंडेकर, योगेश कदम, किशोर जोरगेवार, बबनराव पाचपुते, जयकुमार गोरे, समाधान अवताडे, प्रकाश आवाडे, प्रताप अडसड, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्रीमती विद्या ठाकूर, नमिता मुंदडा, सर्वश्री सुरेश भोळे, सुभाष देशमुख, ॲड. राहुल कुल, श्री महेश लांडगे, श्रीमती मोनिका राजळे, श्री. भिमराव तापकीर, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री पराग शाह, अमित साटम, कालीदास कोळंबकर, प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, जयकुमार रावल, नारायण कुचे, संतोष दानवे, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, डॉ. देवराव होळी, श्री नामदेव ससाणे, डॉ. संदीप धुर्वे, सर्वश्री राजेश पवार, प्रशांत बंब, डॉ. राहूल आहेर, ॲड.राहूल ढिकले, सर्वश्री दिलीप बोरसे, काशिराम पावरा,**

अप्रमाणित प्रत

**श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री सिध्दार्थ शिरोळे, सुनिल कांबळे, ॲड. लक्ष्मण पवार, श्रीमती अश्विनी जगताप, सर्वश्री कुमार आयलानी, तानाजी मुटकुळे, बबनराव लोणीकर, किर्तीकुमार भांगडीया, प्रा. डॉ. अशोक उइके, सर्वश्री संजय बोदकुरवार, राजेश पाडवी, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री हरिष पिंपळे, प्रकाश भारसाकळे, डॉ. संजय कुटे, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री मंगेश चव्हाण, दादाराव केचे, समीर मेघे, टेकचंद सावरकर, विजय रहांगडाले, कृष्णा खोपडे, भिमराव केराम, डॉ. तुषार राठोड, सर्वश्री महेश चौगुले, लखन मलिक, रविशेठ पाटील, राणाजगजितसिंह पाटील, रत्नाकर गुट्टे, संजय सावकारे, विजयकुमार देशमुख, शिवेंद्रसिंह भोसले, ॲड. आकाश फुंडकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"मागील दोन वर्षांच्या काळात मुंबईसह एमएमआरडीए भागात पर्यावरणपूरक व गतीमान दळणवळण आणि गृहनिर्माण तसेच, झोपडपट्टी निर्मूलन हे मुद्दे प्राधान्याने विचारात घेऊन व विकासास केंद्रबिंदू मानून मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर व छत्रपती संभाजीनगर सारख्या मोठ्या शहरात स्थानिकांचे जीवनमान उंचावण्यावर भर देऊन विकासाची नियोजनात्मक कालबध्द कामे हाती घेण्यात आली असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई, ठाणे, पुणे ही शहरे खड्डेमुक्त करण्याची संकल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने तेथील सर्व महत्वाच्या रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करण्याचा निर्णय घेण्यात येणे, मुंबई व ठाण्यासह उपनगरातील धोकादायक इमारतींचा समूह विकास करण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर प्रकल्प राबविण्यात येणे, मुंबईतील रेल्वे स्थानकांच्या दोन्ही बाजूकडील झोपड्डीधारकांच्या पात्रता निश्चित करण्यासाठी एक खिडकी व कालबध्द स्थलांतरण योजना राबविण्याची तसेच, एसआरए प्रकल्पबाधितांच्या न्याय प्रविष्ठ प्रकरणाबाबतीतील शासनाचे धोरण निश्चित करण्याची आवश्यकता, मुंबईतील भेंडीबाजार, धारावीसारख्या गजबजलेल्या भागांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने उभारण्यात येणारे एसबीयुटी सारखे गृहनिर्माण प्रकल्प नागरी पुनरूत्थान घडविणारे असल्याचे निदर्शनास येणे, जुन्या चाळींची व्याख्या बदलून हेरीटेज टीडीआर प्रत्यक्ष अंमलात आला असणे, स्वयंपुनर्विकासाच्या माध्यमातून गृहनिर्माण प्रकल्प अधिक गतीमान करण्यासाठी मुंबई जिल्हा बँकेकडून देण्यात येणाऱ्या कर्ज मर्यादेत वाढ करण्यात आली असणे, एमएमआरडीए क्षेत्रात सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुर्नविकासासाठी मुंबई जिल्हा बँकेला नोडल एजन्सी म्हणून मान्यता देण्यात येणे, मानीव हस्तांतरण करण्यासाठी स्टँम्प ड्युटी भरण्यात सुलभता होण्यासाठी मुद्रांक शुल्क अभय योजना सुरू करण्यात येणे, मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पांतर्गत त्या परिसरातील अनिवासी झोपडीधारक, स्टॉलधारक यांची पात्रता निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू असणे, बीडीडी चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पांना प्रोत्साहन मिळावे यासाठी संबंधित पुनर्विकासाच्या करारनाम्यावर फक्त १ हजार रुपये मुद्रांक शुल्क घेण्याचा निर्णय घेण्यात येणे, झोपडपट्टी पुनर्वसनातील सदनिका हस्तांतरण शुल्कात ५० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात येणे, ठाणे शहरात एमआयडीसीच्या अभिन्यासामधील भूखंडावर जगातील सर्वात मोठा क्लस्टर प्रकल्प राबविण्यात येणे, म्हाडाकडून पुनर्विकास होणाऱ्या इमारतींतील रहिवाशांना तसेच, झोपडीधारकांना विकासकांविरुध्द महारेरामध्ये अपील करण्याचा अधिकार देण्याची आवश्यकता, इमारत पुनर्विकास करताना केलेल्या कराराप्रमाणे तेथील

भाडेकरूंना पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होईपर्यंत बऱ्याच विकासकांकडून भाडे देण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबईतील पोलीस कर्मचाऱ्यांना पुरेसे निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यासाठी दिर्घकालीन, मध्यमकालीन व तात्काळ अशा तीन टप्यांवर उपाययोजना करण्याचा तसेच, म्हाडाच्या मदतीने मुंबईतील पोलीस निवासस्थानांचा पुनर्विकास करण्याचा शासनाने निर्णय घेतला असणे, बंद पडलेल्या गिरण्यांमधील कामगारांना शासनाकडून घरे देण्याची योजना अधिक गतीमान करण्याची आवश्यकता, पुण्यातील सहकारी गृहनिर्माण सोसायट्या व गृहनिर्माण मंडळाच्या वसाहतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करून पुनर्विकास करण्याची आवश्यकता, पीएमआरडीएच्या माध्यमातून पुणे शहरातील डीपी प्लॅन व रिंगरोड नव्याने तयार करण्याची आवश्यकता, पुणे शहरात विमानतळाकरिता जागा राखीव असून अन्य पायाभूत सुविधा तातडीने करण्याची आवश्यकता, स्वारगेट ते कात्रज, खडकवासला ते हडपसर मेट्रो रेल्वेच्या कामाला गती देण्याची आवश्यकता, मेट्रो, अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू, हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्ग, स्वातंत्र्यवीर सावरकर सागरी सेतू, मुंबई-पुणे एक्सप्रेस वे, मिसिंग लिंक इ. पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करून राज्यातील मुंबई-ठाणे-पुणे इत्यादी भागातील प्रवास कमी वेळात व सुखकर करण्याचा प्रयत्न करण्यात येणे, मुंबईत घाटकोपर ते वर्सोवा पहिली लाईन, डीएननगर-चारकोप ते दहिसर आणि डीएननगर-बांद्रा ते मानखुर्द दुसरी लाईन, कुलाबा ते अंधेरी (सीप्झ पर्यंत) तिसरी लाईन, वडाळाहून घाटकोपर, मुलुंड, ठाणे ते कासारवडवली पर्यंत चौथी लाईन, ठाणे ते भिवंडी, कल्याण पाचवी लाईन, स्वामी समर्थ, जोगेश्वरी ते कांजूरमार्ग सहावी लाईन आणि दहिसर पूर्व ते अंधेरी पूर्व एअरपोर्ट पर्यंत सातवी लाईन अशारितीने मुंबईत मेट्रोचे जाळे उभारण्यात आले असल्याने मुंबईवरील दळणवळणाचा बराचसा ताण कमी होण्यास मदत होणार असणे, तसेच मुंबईतील रस्त्यांवरील जवळपास ३५ टक्के ट्रॅफिक कमी होणार असणे, याकरिता महामुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन लि. कंपनीची स्थापना करून संबंधित काम गतीशील करण्यात येणे, नवी मुंबई विमानतळामुळे वाढणाऱ्या लोकसंख्येसाठी नियोजित 'नैना' प्राधिकरणामार्फत २३ गावांच्या नियोजित आराखड्याच्या अंमलबजावणीस गती देण्याची आवश्यकता, सन २०३० पर्यंत एकूण ऊर्जा निर्मितीपैकी ४० टक्के ऊर्जा ही अपारंपारिक पध्दतीने निर्माण करण्याचे उद्दीष्ट असणे, केंद्र शासनाच्या नवीन 'प्रधानमंत्री सुर्य घर मोफत वीज योजना' अंतर्गत रूफ टॉप सोलर पॅनल बसविण्यासाठी ७८ हजार रुपये मर्यादेपर्यंत अनुदान देण्यात येणार असणे, तसेच, ग्राहकांना ३०० युनिट पर्यंतची वीज मोफत मिळणार असणे, राज्यात सर्व उपसा सिंचन योजनांचे सौरऊर्जीकरण करण्यासाठी पुढील दोन वर्षांत आवश्यक तो निधी उपलब्ध करण्याचे प्रस्तावित असणे, वीज सेवा उपलब्ध नसलेल्या राज्यातील सुमारे ३७ हजार अंगणवाडी केंद्रांना सौरऊर्जा संच देण्याचे प्रस्तावित असणे, वन्य प्राण्यांव्दारे होणाऱ्या शेतपीकांच्या नुकसानीला आळा घालण्यासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेंतर्गत शेतकऱ्यांना सौरऊर्जा कुंपनासाठी अनुदान देण्यात येणार असणे, मुंबई महापालिकेच्या विधी खात्यात सन १९७८ ते २०१० या कालावधीत वकीलांचे मानधन, बैठकीसाठीचा खर्च, वाचनालय शुल्क यासह विविध प्रशासकीय कामासाठी १४ कोटी ५७ लाख रूपये आगाऊ रक्कम उचलण्यात आली असल्याची बाब निदर्शनास येणे व विविध माध्यमातून या प्रकरणाचा शोध घेतला जात असताना संबंधित नस्ती सापडत नसल्याने या प्रकरणांची फाईलच बंद करण्याचा निर्णय प्रशासनाकडून घेण्यात आला असल्याची बाब निदर्शनास

येणे, मुंबईतील एकूण १५०८ छोटे नाले व ३०९ मोठे नाले साफ-सफाईकरिता मुंबई महानगरपालिकेने सुमारे २५० कोटी रूपयांची तरतुद केली असल्याची बाब निदर्शनास येणे, पावसाळयापूर्वी नालेसफाईचे ७५ टक्के काम पूर्ण झाल्याचा पालिकेचा दावा खोटा असल्याची बाव निदर्शनास येणे, २ लाख ७३ हजार मेट्रीक टन गाळ कुठे टाकला, क्षेपणभूमी कुठे आहे इ. बाबी प्रश्नांकित असल्याने प्रशासनाने नालेसफाई कामांची श्वेतपत्रिका काढण्याची आवश्यकता, मुंबईकरांच्या सुरक्षेसाठी आणि मुंबईवर नजर ठेवण्यासाठी शासनाकडून सुमारे १ हजार कोटी रूपयांचा निधी दिला असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबईकरांना तात्काळ आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी मुंबईत मोबाईल मेडिकल युनिट सुरु करण्यात आले असणे, राज्यातील महानगरपालिका बरखास्त करून दीर्घकाळ तेथील कार्यभार प्रशासक चालवित असल्याने काही ठिकाणी प्रशासकांकडून मनमानी होत असल्याचे व तेथील माजी नगरसेवकांचा योग्य मान राखला जात नसल्याचे निदर्शनास येणे, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर यासारख्या मोठ्या शहराचा मेगापॉलिस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक गतीने विकास करण्याचा व ही शहरे झोपडपट्टीमुक्त करण्याचा तसेच, पायाभुत सुविधा उभारुन पर्यावरणपूरक विकास करण्याच्या दृष्टीने शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**दहा : अंतिम आठवडा प्रस्ताव** :-

**सर्वश्री विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, अजय चौधरी, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले, सुरेश वरपुडकर, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री आदित्य ठाकरे, भास्कर जाधव, सुनिल प्रभू, अनिल देशमुख, अमीन पटेल, राजेश टोपे, डॉ.नितीन राऊत, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री सुनिल भुसारा, अमित देशमुख, संग्राम थोपटे, अशोक पवार, कुणाल पाटील, राजेश एकडे, अमित झनक, प्राजक्त तनपुरे, श्रीमती सुलभा खोडके, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री सुभाष धोटे, रणजित कांबळे, ॲड. के.सी.पाडवी, सर्वश्री अस्लम शेख, संदिप क्षीरसागर, कैलास गोरंटयाल, विक्रमसिंह सावंत, संजय जगताप, बाळासाहेब पाटील, वैभव नाईक, लहु कानडे, श्रीमती सुमन पाटील, श्री. राजन साळवी, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री सुनिल राऊत, रमेश कोरगावकर, कैलास घाडगे-पाटील, उदयसिंग राजपूत, प्रकाश फातर्पेकर, संजय पोतनीस, श्रीमती ऋतुजा लटके, सर्वश्री शिरीष चौधरी, विकास ठाकरे, सहसराम कोरोटे, माधवराव जवळगावकर-पाटील, मोहनराव हंबर्डे, जितेश अंतापूरकर, हिरामण खोसकर, रविंद्र धंगेकर, धीरज देशमुख, ऋतुराज पाटील, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री राजू आवळे, झिशान सिद्दीकी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यात शैक्षणिक अभ्यासक्रमात मनुस्मृतीचा समावेश करण्याचे मंत्र्यांचे उद्गार, यामुळे पालकांमध्ये पसरलेली तीव्र संतापाची लाट, मनू हा संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराजांपेक्षाही श्रेष्ठ होता, असे वक्तव्य करण्यात येणे, महिला, समाजसुधारक, विशिष्ट समाजाबाबत आणि देशाच्या स्वातंत्र्याबाबत भडकावू व अवमानकारक वक्तव्य

करणाऱ्यांना पाठीशी घालणे, राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्ग व विमुक्त जाती, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम न मिळाल्यामुळे पालकांना सहन करावा लागलेला मनस्ताप, परदेशी शिष्यवृत्तीच्या पात्रतेसाठी अटी व मर्यादा बदलल्याने विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेली नैराश्याची भावना, राज्यातील इतर मागास वर्गातील विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या वसतीगृहांच्या उभारणीची प्रक्रिया संथ गतीने सुरु असल्यामुळे विद्यार्थ्यांची होत असलेली गैरसोय, राज्य शासनाने बार्टी, सारथी, महाज्योती, टीआरटीआय या संस्थांच्या कामकाजात समानता आणण्याचा निर्णय घेऊनही अनेक विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणे, परिणामी, अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण सोडण्याची वेळ येणे, सारथी, महाज्योती, बार्टी, मार्टी व इतर सर्व महामंडळाना पुरेसा निधी शासनाकडून उपलब्ध न होणे, निधी उपलब्ध झाल्यास खर्च करण्यामध्ये दिरंगाई होणे, यामुळे राज्यातील उपेक्षित वर्गाची कुचंबणा होऊन मुख्य प्रवाहात येण्यास अडथळा निर्माण होणे, इतर महामंडळाच्या तुलनेत मौलाना आझाद विकास महामंडळाच्या निधी व सुविधांबाबत दुजाभाव होत असल्यामुळे अल्पसंख्याक समाजात पसरलेली नाराजीची भावना, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे महत्त्वाचे प्रशिक्षण उपक्रम बंद पडले असल्यामुळे राज्यातील हजारो विद्यार्थी यापासून वंचित असणे, विविध समाजाच्या मागण्यांसंदर्भात शासनाची असलेली अनास्था, विविध प्रलोभने दाखवून मराठा समाजाला आरक्षणासाठी तिष्ठत ठेवल्यामुळे मराठा समाजाचा आरक्षणाचा प्रश्न अद्यापही प्रलंबित असणे, सगेसोयरे शब्दाचा अर्थ स्पष्ट न केल्याने समाजात निर्माण झालेला संभ्रम व असंतोषाचे वातावरण, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या मनमानी कारभारामुळे मराठा समाजातील तरुणांना भुर्दंड व प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागणे, राज्यातील धनगर, मुस्लिम व लिंगायत समाजाच्या आरक्षणाचे विषय प्रलंबित असून यासंदर्भात सुरु असलेली आंदोलने, त्यामुळे या समाजात शासनाविरोधात असलेली तीव्र भावना, राज्यात ओबीसी समाजाची आरक्षणासंदर्भात सुरु असलेली आंदोलने व याबाबत शासनाच्या दुटप्पी भूमिकेमुळे पसरलेला असंतोष, बिहारच्या धर्तीवर राज्यामध्ये जातीनिहाय जनगणनेची समाजाच्या विविध वर्गातून होत असलेली मागणी, राज्यात गुण्या-गोविंदाने राहणारे सर्व समाज शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे एकमेकांविरोधात उभे रहात असणे, दिव्यांग कल्याण विकास मंत्रालयाची घोषणा करूनही विभागास पुरेसा निधी उपलब्ध न होणे, या विभागाला पूर्ण ताकदीने कार्यान्वित करण्याबाबत शासनाला आलेले अपयश, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ अनुदान योजनेचे लाभार्थी तसेच विधवा, परित्यक्तांना शासकीय योजनांचे वेळेत लाभ न मिळणे, विविध समाजातील महिला व युवकांचे प्रलंबित असलेले प्रश्न, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या समाजावरील अत्याचाराच्या घटना वाढत असताना शासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होणे, पावसाळ्यात झोपडपट्टी तोडू नये असे मा.सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतानाही भर पावसात मुंबईतील पवई येथील जयभीम नगरच्या रहिवाशांवर झोपडी हटविताना गर्भवती स्त्री व लहान मुलाला झालेली मारहाण, तसेच ६०० मागासवर्गीय कुटूंबांना बेघर केल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली अन्याय व संतापाची भावना, शाळेच्या पहिल्याच दिवशी ४८ लाख विद्यार्थ्यांना गणवेशाविनाच शाळेत यावे लागल्याने मोफत गणवेश व पुस्तके या शासनाच्या धोरणाला बसलेली खिळ, विदर्भातील ११ जिल्हे हे महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत मागासलेले असणे, विदर्भाचा अनुशेष मोठ्या प्रमाणात असून देखील सरकारला तो भरुन

काढण्यात आलेले सपशेल अपयश, मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पासाठी ठोस निधीची तरतूद न करणे, राज्यातील रखडलेले जलसंपदा प्रकल्प, मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पाबाबत शासनाची असलेली उदासिनता, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ हा १३ वर्षांपासून रखडलेला असणे, या ठिकाणी होत असलेल्या अपघातांमुळे वाढत असलेली प्राणहानी, कोकणातील आंबा, काजू, फणस, नारळ, सुपारी बागा नष्ट होण्याच्या मार्गावर असणे, मच्छिमार बांधवांची सुरू असलेली उपासमार, माहे जुलै, २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे कोकणातील ग्रामीण भागातील रस्त्यांची झालेली दुरवस्था, मनरेगा अंतर्गत प्रलंबित कामे व निधीची आवश्यकता, निजामकालीन शाळांच्या बांधकाम अनुदानाची समस्या, सभागृहात दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न होणे, या शासनाच्या कार्यकाळात बळावलेला भ्रष्टाचार, कृषी तसेच इतर विभागात वाढत असलेला भ्रष्टाचार, राज्यातील महानगरपालिका व नगरपालिकेमध्ये प्रशासक असल्यामुळे अधिकाऱ्यांची सुरू असलेली एकाधिकारशाही, विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामांमध्ये वाढत असलेला भ्रष्टाचार, मेट्रो-१ प्रकल्पात रिलायन्स इन्फ्रा कंपनीचा हिस्सा अधिक किंमतीत खरेदी करण्याच्या निर्णयामुळे शासनाचे झालेले कोट्यवधी रुपयांचे नुकसान, विविध देवस्थान तसेच वक्फ बोर्ड जमिनींचा गैरव्यवहार, महसूल विभागातील जुन्या कायद्यांमध्ये कालसुसंगत सुधारणेची आवश्यकता, राज्यात सुरु असलेली राष्ट्रीय महामार्गाच्या विस्तारीकरणाची कामे अपूर्ण असतानाही पूर्ण टोल घेण्यात येणे, जिल्ह्यात महामार्गावर एकच टोल अपेक्षित असताना एका जिल्ह्यात दोन ठिकाणी टोल असणे, स्थानिक नागरिकांना टोल-पास न दिल्यामुळे स्थानिकांचा वाढत असलेला असंतोष, राज्यातून उद्योगांचे पलायन होणे, अनेक उद्योग परराज्यात स्तलांतरीत करण्यासाठी सक्ती करणे, दाव्होस आर्थिक परिषदेमध्ये अनेक सामंजस्य करार होऊनही एकही प्रकल्प कार्यान्वित न होणे, याबाबत शासनाने श्वेतपत्रिका सादर करण्याचे आश्वासन देऊनही अद्याप काही कार्यवाही न होणे, त्यामुळे लाखो उच्चशिक्षित तरुणांना रोजगार मिळत नसल्याने युवकांमध्ये वाढलेला असंतोष, अकुशल व अल्पशिक्षित युवकांना रोजगारासाठी करावी लागणारी वणवण, नोकरभरतीकडे दुर्लक्ष, बेरोजगारीचे वाढते प्रमाण, तलाठी, वन व इतर विभागातील नोकरभरती प्रक्रियेत तसेच नीट परिक्षेत झालेली पेपरफुटी प्रकरणे, संबंधित दोषींवर कारवाई न होणे, कामगारांच्या प्रश्नांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**अकरा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(शुक्रवार, दिनांक ५ जुलै, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या तथापि चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ व २)**

**(१) श्री. अमिन पटेल, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईमध्ये नामांकित रूग्णालयामधील एक रुग्णालय सर जे.जे. ग्रुप रुग्णालय असणे, या रुग्णालयात अनेक सोयी सुविधांचा अभाव असणे, या रुग्णालयात औषधांचा तुटवडा असणे, सि.टी. स्कॅन मशीन व एम.आर.आय मशीन बंद असणे,

रुग्णांना औषधे बाहेरून घेण्यासाठी भर दिला जाणे, बहुतांश वैद्यकीय चाचण्या बाहेरून करून घेतल्या जाणे, ऑपरेशन थिएटर मागील काही काळापासून बंद असल्याची बाब निदर्शनास येणे, रुग्णालयात सी. टी. स्कॅन करण्यासाठी दीर्घ मुदतीच्या तारखा देण्यात येणे, त्यामुळे रुग्णांवर वेळेत उपचार न होणे, महानगरपलिकेच्या नायर रुग्णालयात देखील रुग्णांचे हाल होत असणे, त्याचप्रमाणे कामा रुग्णालय, सेंट जॉर्ज रुग्णालय, जी. टी. रुग्णालय येथे देखील औषधांचा तुटवडा असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक त्रस्त असणे, परिणामी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) ॲड. पराग अळवणी, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई शहरासह राज्यात अंमली पदार्थाच्या तस्करी आणि विक्रीत वाढ झाल्याचे मुंबई पोलिसांच्या आकडेवारीनुसार समोर आलेले असणे, आकडेवारीनुसार मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने गेल्या आठ महिन्यात ९१७ प्रकरणात सुमारे ४६ कोटींचे अंमली पदार्थ जप्त केलेले असणे, यात सर्वात जास्त एमडी अंमली पदार्थ जप्त करण्यात आला असून, याची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत २८ कोटी एवढी किंमत असणे, अंमली पदार्थाचे व्यसन पूर्वी उच्चभ्रू वस्तीतील लोकांपर्यंत मर्यादित होते. मात्र आता अंमली पदार्थ सर्वसामान्यांच्या आवाक्यात आलेले असून परिणामी अंमली पदार्थांच्या विळख्यात मोठमोठ्या आयटी कंपन्यामध्ये किंवा कॉर्पोरेट कंपन्यांमधील कर्मचारी, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपासून ते शाळकरी मुलेसुद्धा येणे, काही प्रकरणात अंमली पदार्थांचा वापर शारीरिक आणि लैंगिक क्षमता वाढविण्यासाठी देखील केला जात असल्यामुळे तरुणांमध्ये अंमली पदार्थांच्या सेवनाचे प्रमाण वाढलेले असणे, काही पबमध्ये अंमली पदार्थाची विक्री करण्यात येत असून तरुण तरुणींना ड्रग्सचे व्यसन लावले जात असणे, त्यानंतर तरुणींचा वापर ड्रग्स तस्करी आणि देहव्यापारासाठी करण्यात येत असल्याची काही प्रकरणे समोर आलेली असणे, शहरातील तरुणांप्रमाणेच आता राज्यातील छोट्या छोट्या गावांमध्येही तरुण मुले व्यसनाच्या आहारी जाणे, त्यामुळे राज्यातील वाढत्या अंमली पदार्थ विक्रीवर शासनाने लवकरात लवकर ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता."

**(मंगळवार, दिनांक ९ जुलै, २०२४ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (क्रमांक ३ व ४)**

**(३) श्री. अस्लम शेख, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई उपनगरातील मालाड (प) मालवणी, दादासाहेब गायकवाड नगर येथे म्हाडाचे २५०० बैठे निवासी गाळे असून शासनाने दिनांक १८ जुलै, १९८७ रोजीच्या शासन निर्णयान्वये बैठे निवासी गाळे विक्री योजना लागू केलेली असणे, त्यानुसार सन १९९३ मध्ये गाळेधारकांच्या संमती पत्रकानुसार परवानगी देण्यात आलेली असणे, परंतु सदर योजनेस अत्यल्प प्रतिसाद मिळाला असून २५०० बैठे निवासी

गाळेधारकांपैकी १४२९ निवासी गाळयांना विक्री योजनेअंतर्गत सहभागी करण्यात आलेले असणे, उर्वरित १०७१ बैठे निवासी गाळेधारक अपरिहार्य कारणामुळे योजनेत सहभागी होऊ शकलेले नसणे, बैठे निवासी गाळेधारक अत्यल्प उत्पन्नधारक असणे, अनेक गाळेधारकांकडे पैसे नसल्याने सदरच्या विक्री योजनेत सहभागी होता आलेले नसणे, शासनाने १०७१ बैठे निवासी गाळे धारकांसाठी नवीन विक्री योजना जाहिर करून निवासी गाळे हस्तांतरीत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री. राजेश एकडे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"नांदुरा शहराच्या मध्यभागातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ०६ वर सतत वाहतुकीची वर्दळ असणे, नांदुरा शहराच्या मध्यभागातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गापासून अवघ्या ४० मीटर अंतरावर रेल्वे क्रॉसिंग गेट असणे, नांदुरा रेल्वे स्थानकावरून देखील रेल्वेची वाहतूक दिवस-रात्र सुरू असणे, परिणामी सदर रेल्वे क्रॉसिंग वरील गेट तासनतास बंद ठेवावे लागणे, रेल्वे क्रॉसिंग गेट वारंवार बंद असल्याने सदर ठिकाणी वाहतुकीची कोंडी होणे, वाहनांच्या मोठ्या रांगा राष्ट्रीय महामार्ग पर्यंत येऊन महामार्गावर दोन तीन किलोमीटर परिसरात वाहनांच्या रांगा लागणे व वाहतूक ठप्प होणे, परिणामी रुग्ण, शासकीय कर्मचारी, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी/विद्यार्थिनी व प्रवासी यांना आपल्या कर्तव्याच्या ठिकाणी पोहोचण्याची गैरसोय होणे, नांदुरा रेल्वे क्रॉसिंग वर आर.यु.बी [भुयारी मार्ग] मंजूर करून कार्यान्वित करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १० जुलै, २०२४.

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.